DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021

कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

आतील पानांत

दिवाळीनंतर कोरोना पुन्हा फोफावण्याची शक्यता; राजेश टोपे यांचा इशारा

अखेर सणासुदीत का होईना खाद्यतेलाचे दर घटणार

संरक्षणक्षेत्रातील आत्मनिर्भरतेकडे...

अग्रलेख / 5

www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ




शहापूर वैभव विशेष

>>पान ५ वर

भारतीय सौर दिनांक कार्तिक २८ शके १९४४ | वर्ष ४७ | अंक ५४ | बुधवार २० ऑक्टोबर २०२१ | पाने ६ | रु. ४

संपादक : मिलिन्द बल्लाळ

# ठाण्यात उत्साहाची 'लाट'; ८५ टक्के लोकांमध्ये प्रतिपिंडे !

## आता भीतीचा मास्क काढा, सावधगिरीचा मास्क लावा

ठाणे | आनंद कांबळे

**ठाणे महापालिका हद्दीतील सुमारे 85 टक्के नागरिकांच्या शरीरात प्रतिपिंडे सापडल्याचे सीरो सर्वेक्षण अहवालातून स्पष्ट झाले आहे. महापालिकेने 10 ऑक्टोबरपासून सीरो सर्वेक्षण सुरू केले आहे. तीन प्रभाग समिती क्षेत्रातील 480 नागरिकांचे रक्त चाचणीकरिता घेण्यात आले होते. त्यामध्ये सुमारे 85टक्के नागरिकांच्या शरीरात प्रतिपिंडे सापडली आहेत.**



केंद्र सरकारने देशात मोठ्या प्रमाणात लसीकरण मोहीम हाती घेतली आहे. ठाणे महापालिका हद्दीत आत्तापर्यंत 15 लाख 48 हजार 989 नागरिकांचे लसीकरण करण्यात आले आहे. त्यामध्ये आठ लाख 30 हजार 902 पुरुष आणि सात लाख सात हजार 805 महिलांचे लसीकरण झाले आहे यामध्ये कैदी आणि मनोरुग्णांची नोंद करण्यात आलेली नाही.

शहरातील 18 ते 44 वयोगटातील आठ लाख 54 हजार 857 नागरिकांना लस देण्यात आली आहे. 44 ते 60 वयोगटातील चार लाख नऊ हजार 333 ठाणेकर आणि 60 वर्षावरील दोन लाख 74 हजार 517 नागरिकांचे लसीकरण झाले असून या पैकी दहा लाख 11 हजार 198 जणांना पहिला तर पाच लाख 27 हजार 509जणांना दुसरा डोस देण्यात आला आहे.

महापालिका हद्दीतील नागरिकांचे 50 ते 60 लसीकरण केंद्रावर लस दिली जात असून बस आणि विशेष लसीकरण शिबिरांचे आयोजन केले जात असल्याने ठाणेकर नागरिकांच्या शरीरात प्रतिपिंडे सापडल्याचा महापालिकेचा दावा आहे.

ठाणे शहराची अंदाजे 22 लाख इतकी लोकसंख्या आहे. त्यापैकी 15 लाख 50 हजार नागरिकांचे महापालिकेच्या माध्यमातून लसीकरण करण्यात आले आहे. काही ठाणेकर

>>पान २ वर

**कोरोनाचा संसर्ग फोफावू नये म्हणून सण-उत्सवात निर्बंध लावण्यात आले आहेत. सलग दीड ते पावणे दोन वर्षे दडपणाखाली वावरल्याने नागरिकांना मानसिक आजाराचा धोका संभवतो. ठाण्यातील सीरो सर्वेक्षणात मात्र 85टक्के नागरिकांमध्ये प्रतिपिंडे आढळून आल्याने तसेच लसीकरणाचा वेग वाढल्याने दिलासादायक वातावरण तयार झाले आहे. नागरिक सण-उत्सव दडपणाखाली साजरे न करता मोकळ्या वातावरणात साजरे करणार असल्याचे बोलले जात आहे. असे असले तरी मास्क, हात धुणे, स्वच्छता या त्रिसूत्रीकडे दुर्लक्ष होता कामा नये, असे मतही वैद्यकीय क्षेत्रातून व्यक्त होत आहे.**



# दुकाने रात्री ११ तर उपाहारगृहे, हॉटेल १२ वाजेपर्यंत सुरू राहणार

**मुंबई:** कोरोना रुग्णआलेख घसरल्याने दिवाळीच्या तोंडावर दुकाने, उपाहारगृहे, मॉलची वेळमर्यादा वाढविण्याचा निर्णय राज्य सरकारने सोमवारी घेतला. करमणूक उद्यानेही (अम्युझमेंट पार्क) सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. उपाहारगृहे, हॉटेल्स रात्री 12 वाजेपर्यंत तर सर्व प्रकारची दुकाने रात्री 11 वाजेपर्यंत सुरू ठेवण्यास राज्य शासनाने परवानगी दिली आहे.

मुख्यमंत्र्यांनी सोमवारी टास्क फोर्ससोबत चर्चा केल्यानंतर राज्य सरकारने राज्यातील उपाहारगृहे आणि दुकाने यांची वेळ वाढवण्याचा निर्णय घेतला. 22 ऑक्टोबरपासून नाट्यगृहे आणि चित्रपटगृह सुरु केली जाणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर उपहारगृहांची वेळ देखील वाढवण्याची मागणी करण्यात आली होती. ही वेळ वाढवली जाणार असल्याचं राज्य सरकारकडून स्पष्ट करण्यात

>>पान २ वर

## थोडक्यात

### मुस्लीम आणि दलितांची नावे मतदार याद्यांमधून गायब?

**गृहनिर्माणमंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांचा गौप्यस्फोट**

**ठाणे:** मुस्लीम आणि दलितांची नावे जाणीवपूर्वक मतदार याद्यांमधून कापली जात असल्याचा गौप्यस्फोट राष्ट्रवादीचे नेते तथा गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

पुढील वर्षी ठाणे महापालिकेची निवडणूक होत आहे. या पार्श्वभूमीवर मतदार याद्या अद्ययावत करण्यात येत आहेत. मात्र,

>>पान २ वर

### एअरटेल मोबाईल टॉवरसाठी लाखोंची वीजचोरी

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी मार्केट) इमारतीच्या छतावर असलेल्या एअरटेल मोबाईल टॉवरसाठी फिडर पिलरमधून थेट वीजचोरी होत असल्याची घटना उघडकीस आली आहे.

गेल्या सहा महिन्यात टॉवरसाठी आठ लाख 19 हजार रुपये किंमतीची 56 हजार 150 युनिट वीज चोरून वापरल्याबद्दल मे. सुयोग

>>पान २ वर

### ठाण्यात वैफल्यग्रस्त सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याची आत्महत्या

**ठाणे:** ठाण्यात बाळासाहेब साळुंखे (62) या वैफल्यग्रस्त निवृत्त पोलीस जमादाराने येऊर परिसरातील एका खांबाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. ते ठाणे शहर वाहतूक शाखेतून निवृत्त झाले होते.

ठाणे शहर पोलीस दलातील वाहतूक शाखेतून

>>पान २ वर

### वागळे-मुंब्यात शून्य रुग्ण

**ठाणे:** शहरातील कोरोना रुग्णसंख्या किंचित कमी झाली आहे. आज 50 नवीन रुग्णांची भर पडली आहे. 67 रुग्ण कोरोनामुक्त झाले असून सुदैवाने एकही रुग्ण दगावला नाही.

महापालिका क्षेत्रातील कोरोना हॉट स्पॉट असलेल्या प्रभाग समितीमध्ये कोरोनाचे रुग्ण कमी होऊ लागले आहेत. माजिवडे-मानपाडा प्रभागात 18 तर वर्तकनगर हद्दीत 16 रुग्ण आढळून आले आहेत. लोकमान्य-सावरकरनगर प्रभागात चार, नौपाडा-कोपरीत

>>पान २ वर

# कौसा रुग्णालयाचा खर्च २७ कोटींवरून १४७ कोटींवर !

- कंत्राटदारासाठी वाढीव कामांची खिरापत
- आठ वर्षानंतरही रुग्णालयाचे लोकार्पण नाही




**ठाणे :** कौसा येथे 100 बेडचे पालिकेचे रुग्णालय उभारणीचा निर्णय पालिकेच्या सर्वसाधारण सभेने जुलै, 2013 साली घेतला होता. त्यावेळी या रुग्णालयासाठी सुमारे 27 कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. मात्र, वाढीव कामांची सबब देत पालिकेने या रुग्णालयासाठी तीन वेळा स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबवून कामाचा खर्च तब्बल 147 कोटींवर नेऊन ठेवला आहे.

विशेष म्हणजे तिन्ही निविदा प्रक्रियांमध्ये एकच निविदाकर पात्र ठरला आहे. कामाचा खर्च साडे पाच पटीने वाढला असतानाही रुग्णालयाची बेड क्षमता 100 पेक्षा जास्त झालेली नाही. तसेच, आठ वर्षे चर्चेत असलेल्या या रुग्णालयाचे अद्याप लोकार्पणही झालेले नाही. या रुग्णालयाच्या कामात प्रशासकीय पातळीवर खूप मोठा भ्रष्टाचार झाला असून त्याची सखोल चौकशी व्हायला हवी अशी मागणी भाजपच्या नगरसेविका मृणाल पेंडसे यांनी केली आहे.

कौसा रुग्णालयाच्या कामात भ्रष्टाचार झाल्याची माहिती मिळाल्यानंतर मृणाल पेंडसे यांनी पालिकेत पत्रव्यवहार करून या कामाचे आजवरच्या प्रशासकीय आणि वित्तीय मंजूरीची कागदपत्रे प्रशासनाकडे मागितली होती. त्या कागदपत्रावरून या रुग्णालयाची

>>पान २ वर

**प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांचे संगनमत**

**या रुग्णालयाचे काम करणारा ठेकादार हा शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या बड्या नेत्यांच्या संपर्कातला आहे. तसेच त्याने पालिकेच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांशीसुध्दा हितसंबंध प्रस्थापित केलेले आहेत. त्या संगनमानतूनच या वादग्रस्त कामाचा फुगा फुगविण्यात आला आहे. त्यात ठाणेकरांनी कर रुपाने भरलेल्या पैशांची अक्षरश: लूट सुरु आहे. ती तातडीने थांबविण्याची मागणी मृणाल पेंडसे यांनी केली आहे. बुधवारी होणाऱ्या पालिकेच्या सर्वसाधारण सभेत या रुग्णालयाच्या गैरकारभाराचा विषय चर्चेला येणार आहे. सभागृहात निष्पक्ष आणि ठाणे शहराच्या हिताचा निर्णय झाला नाही तर या प्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल करू. तसेच, गरज वाटल्यास उच्च न्यायालयात जनहित याचिकासुध्दा दाखल करू असा इशारा पेंडसे यांनी दिला आहे.**

# भाजपची कार्यपद्धती जनतेच्या हितास मारक

## ठाण्यात महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांची टीका

**ठाणे :** भाजपचे तत्वज्ञान किंवा कार्यपध्दती ही देशाच्या, जनतेच्या हिताची नाही. त्यामुळेच राज्यात किमान समान कार्यक्रमाअंतर्गत महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झालेले आहे. भाजपला ज्या ज्या पातळीवरुन दूर ठेवायचे असेल त्यानुसार ते, ते निर्णय घेतले जातील, असा विश्वास महसुलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला आहे. त्यासाठी सबुरीचा सल्ला देखील त्यांनी दिला आहे.

काँग्रेसचे माजी आमदार कांती कोळी यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले. त्यांच्या कुटुंबियांचे सात्वन करण्यासाठी ते ठाण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. कच्च्या तेलाच्या किमती कमी झाल्यानंतरही इंधन दरवाढ होत आहे. दुर्देवाने केंद्र सरकार त्याची



(छाया- गजानन हरिमकर

दखल घेत नाही. काँग्रेसच्या काळात एक रुपयाची जरी इंधनवाढ झाली तरी भाजपकडून आंदोलन केले जात होते. मात्र, आता ते लपुन बसले आहेत का? त्यांचा शोध घेण्याची वेळ आल्याचा टोलाही त्यांनी लगावला आहे.

केंद्राने दर कमी करावेत असेही त्यांनी सांगितले. राज्य सरकारची जबबादारी यात

>>पान २ वर

**राधाकृष्ण विखे पाटील यांनीदेखील आणखी एका नेत्याचा भ्रष्टाचार बाहेर काढणार असल्याचे वक्तव्य केले आहे. परंतु अशा नेत्यांची आता किव येत आहे, मोठ्या आशेने त्यांची किव आली आहे, शपथविधीचे स्वप्न पाहत होते, नवीन कपडेही शिवत होते, आज सरकार पडेल, उद्या सरकार पडले असे वाटत होते, परंतु तसे होत नसल्याने त्यांच्यात नैराश्य आलेले आहे. त्यामुळेच् असे बेताल वक्तव्य केले जात असल्याची टिकाही त्यांनी केली. उद्या रस्त्यावर उतरुन लोकांना दगडं मारले नाही, म्हणजे बर असा टोलाही त्यांनी लगावला आहे. कोरोनाचे संक्रमण कमी झाले असले तरी कोरोना संपलेला नाही. परंतु तरीदेखील हिवाळी अधिवेशन नागपुरला होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**

# डोंबिवलीत तब्बल दोन वर्षांनी वाजणार तिसरी घंटा

**डोंबिवली :** कोरोनाच्या महामारीनंतर आता सरकारने काही प्रमाणात अनलॉक करण्यास सुरुवात केली आहे. सांस्कृतिक नगरी म्हणून ओळख असलेल्या डोंबिवलीच्या सावित्रीबाई नाट्यगृहाचा पडदाही नाटकासाठी उघडला जाणार आहे. नाटकाचा पहिला प्रयोग राज्यात डोंबिवलीत होणार आहे.

डोंबिवलीत शनिवारी दुपारी नाटकाचा पडदा उघडणार असून डोंबिवलीतील रसिक प्रेक्षकांना तब्बल दोन वर्षांनी तिसरी घंटा ऐकु येणार आहे. विशेष म्हणजे मूळच्या रसिक असणाऱ्या डोंबिवलीकरांची तिकीट खिडकीवर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून तिकीट काढण्याचा पहिला नंबर मोहन पाठक या डोंबिवलीकर नाट्यरसिकला मिळाला आहे. महाराष्ट्रात नाटकाचा पहिला प्रयोग डोंबिवलीत होत आहे.

रसिक प्रेक्षकांमध्ये चैतन्य आणण्यासाठी जेष्ठ अभिनेते तथा निर्माते प्रशांत दामले यांच्या एका लग्नाची पुढची गोष्ट या नाटकाची शनिवारी तिसरी




घंटा डोंबिवलीत वाजणार आहे. त्यामुळे सावित्रीबाई नाट्यगृह आणि नाट्यप्रेमी रसिक प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत असे सावित्रीबाई फुले नाट्यगृहाचे व्यवस्थापक दत्तात्रय लधवा यांनी सांगितले. तर अभिनेते प्रशांत दामले म्हणाले डोंबिवलीत तिकीट विक्रीला प्रचंड प्रतिसाद आहे. नाट्यगृहाचे रोजच निर्जंतुकीकरण करण्यात येत असून राज्य सरकारने सूचना दिल्यानुसार केवळ 50 टक्के क्षमतेने हे नाट्यगृह सुरु करण्यात येणार आहे.

# बार सुरू करण्यासाठी रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवत घातला गोंधळ

## पोलीस कर्मचाऱ्यासह सहा जणांना अटक

**कल्याण :** रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवत ऑर्केस्ट्रा बारमध्ये एका पोलीस कर्मचाऱ्यांसह सहा जणांनी गोंधळ घातला. यावेळी त्यांनी रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवून बार उशिरापर्यंत सुरु ठेवा अशी धमकी बार मॅनेजरला दिली. कल्याणच्या ताल बारमध्ये काल रात्री दहाच्या सुमारास हा प्रकार घडला.

याप्रकरणी कल्याणच्या महात्मा फुले पोलीस ठाण्यात या पोलीस कर्मचाऱ्यासह सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या सहा जणांना पोलिसांनी अटक केली आहे. उत्तम घोडे असे या पोलीस कर्मचाऱ्यांचे नाव असून तो टिटवाळा पोलीस ठाण्यात कार्यरत




आहे. टिटवाळ्यामध्ये राहणारा शेखर सरनोबत आपल्या काही मित्रांसोबत कल्याण पश्चिमेतील ताल बारमध्ये पार्टी करण्यासाठी आला होता. शेखरसोबत त्याचे पोलीस मित्र उत्तम घोडे, मंगल सिंग चौहान, रिकीन गज्जर, हरिश्याम सिंह, विक्रांत बेलेकर होते. घोडे हा पोलीस कर्मचारी टिटवाळा पोलीस

>>पान २ वर




प्रसिद्धीच्या झोतात न आलेल्या पण सुप्रसिद्ध समाजसेवीपेक्षा कणभरही कमी नसलेल्या, तुमच्या आमच्यासारख्या पन्नास ज्येष्ठ नागरिकांच्या, ठाणेवैभव दैनिकाने नियमित प्रसिद्ध केलेल्या मुलाखतींचे संकलन असलेले सेकंड इनिंग हे स्फूर्तिदायक पुस्तक शारदा प्रकाशनने नुकतेच प्रकाशित केले आहे.

प्रकाशक श्री. संतोष राणे

लेखिका श्रीमती कुमुदिनी नरेन्द्र बल्लाळ

ठाणेवैभव कार्यालयात उपलब्ध

# जिल्ह्यात रब्बी हंगामाचे क्षेत्र १२ हजार हेक्टरपर्यंत वाढणार

## ७४५ हेक्टरवर हरभरा लागवड

**ठाणे:** ठाणे जिल्हयात रब्बी हंगामात दुबार पिके घेण्यासाठी कृषि विभाग प्रयत्नशील आहे. त्याचाच एक भाग म्हणून प्रमाणित हरभरा बियाणे वाटप सप्ताह 24 ऑक्टोबरपर्यंत आयोजित करण्यात आला आहे. भात पड क्षेत्रात हरभरा पिकाची प्रात्यक्षिके 745 हेक्टर क्षेत्रावर घेण्यात येत आहेत. त्यासाठी 447 क्विंटल बियाणांचा पुरवठा तालुकास्तरावर करण्यात आल्याची माहिती कृषी विभागामार्फत देण्यात आली.

जिल्ह्यात खरीप हंगामात 65 हजार हेक्टर क्षेत्रावर विविध पिके घेतली जातात. त्यात प्रामुख्याने 55 हजार हेक्टर क्षेत्रावर भात पिकाचा समावेश होतो. उर्वरित क्षेत्रावर नाचणी, वरी, कडधान्ये व बांधावर तुर घेतली जाते. जिल्ह्यात रब्बी हंगामात पाहिजे त्या प्रमाणात पिके घेतली जात नाहीत. या हंगामातही दुबार पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत, असे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व विभागीय कृषी सहसंचालक अंकुश माने यांनी सांगितले.

**जिल्ह्यातील भेंडी निर्यातीसाठी प्रयत्न**

यावर्षी रब्बी उन्हाळी हंगामात कडधान्य पिकाबरोबरच भाजीपाला क्षेत्र वाढीसाठीही विस्तार करण्यात येत आहे. निर्यातक्षम भाजीपाला उत्पादनासाठी भेंडी लागवड शास्त्रोक्त पध्दतीने करण्यात येत आहे. भेंडीची निर्यात करणे सोयीस्कर व्हावे यासाठी भेंडी उत्पादक शेतकऱ्यांची व्हेजनेट प्रणालीव्दारे नोंदणी केली जात आहे.

जिल्ह्यात रब्बी उन्हाळी हंगामात कडधान्य, गळीतधान्य, भाजीपाला लागवड व तृणधान्या मध्ये मका पिकाची क्षेत्र विस्तारात समावेश करुन एकुण क्षेत्र 12 हजार हेक्टरवर

>>पान २ वर

मीटिंग, कॉन्फरन्स, लग्न सराई आणि इतर कौटुंबिक कार्यक्रम साजरा करण्यासाठी ठाण्यातील सर्वात उत्तम ठिकाण

परम बँक्वेट हॉल | सर्व सोयीसुविधांनी सुसज्ज




param BANQUETS

+91 90290 74377 | +91 99672 76979

Amber Arcade, Below Wavikar Eye Institute, Majiwada, Lodha service road, Thane (W).

www.parambanquets.com

पान १ वरुन

## ठाण्यात उत्साहाची 'लाट'; ८५ टक्के लोकांमध्ये प्रतिपिंडे !

मुंबई आणि इतर ठिकाणी कामाला जातात. तेथे असलेल्या कार्यालयामार्फत लसीचे दोन्ही डोस त्यांनी घेतले आहेत. त्यांची देखील नोंद ठाण्यात झालेली नाही. असे किमान एक ते दोन लाख ठाणेकर असल्याचा अंदाज आहे. त्याचबरोबर झोपडपट्टी भागातील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिपिंडे सापडली आहेत, असे देखील महापालिकेचे अधिकारी म्हणाले.

महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांनी लसीकरण मोहिमेचे योग्य नियोजन केले. प्रभाग स्तरावर ही मोहीम राबवली, त्यामुळेच रुग्ण वाढ कमी झाली आहे तसेच मृत्यू दर देखील कमी झाल्याचे त्यांनी सांगितले.

## दुकाने रात्री ११ तर उपाहारगृहे, हॉटेल १२ वाजेपर्यंत सुरू राहणार

आलं आहे. रुग्णसंख्या घटल्याने निर्बंध शिथिल करावेत आणि दुकानांच्या वेळा वाढवून देण्यात याव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली होती. यासंदर्भात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोनाविषयक कृतिगटाच्या तज्ज्ञांशी सोमवारी सविस्तर चर्चा केली. त्यानंतरच दुकाने, उपाहारगृहांची वेळमर्यादा वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला.

कोरोनाचा संसर्ग कमी झाल्याने शाळा, महाविद्यालये, चित्रपटगृहे तसेच नाट्यगृहे खुली करण्यास सरकारने परवानगी दिली आहे. बुधवारपासून महाविद्यालये, तर शुक्रवारपासून चित्रपटगृहे, नाट्यगृहे सुरु होणार आहेत. त्याच दिवसापासून करमणूक उद्याने खुली करण्यास परवानगी देण्यात येणार आहे. दिवाळीच्या खरेदीसाठी होणारी गर्दी लक्षात घेता शॉपिंग मॉल, सर्व व्यापारी दुकानांची वेळ वाढवून देताना रात्री 12 नंतर कोणतेही दुकान सुरु राहणार नाही, याची खबरदारी घेण्याची सूचना स्थानिक प्रशासनाला देण्यात आली आहे. वेळमर्यादा ठरविण्याचे अधिकार स्थानिक प्रशासनाला देण्यात आले असले तरी मुंबई, ठाणे, पुणे या मोठ्या शहरांमध्ये रात्री 11 पर्यंत व्यवहार खुले ठेवण्यास मुभा दिली आहे. याबाबत बुधवारी मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत आहे.

## कौसा रुग्णालयाचा खर्च २७ कोटींवरून १४७ कोटींवर !

वादग्रस्त पद्धतीने मंजूर केलेली कामे चव्हाट्यावर आली आहेत.

कौसा येथे रुग्णालय उभारणीसाठी राज्य सरकारकडून अर्थसहाय्य मिळणार असल्याची सबब देत सेक्टर 9 येथील आरक्षित जागेवर रुग्णालय उभारणीचा प्रस्ताव 2013 साली सर्वसाधारण सभेत मांडण्यात आला होता. या कामासाठी 27 कोटी 24 लाख रुपये खर्चाच सर्वसाधारण सभेने मान्यता दिली होती. त्यानंतर 2014 साली या कामासाठी 54 कोटी 38 लाख रुपये खर्चास मान्यता देण्यात आली. हे काम 30 महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, काम पूर्ण होत असताना रुग्णालयाच्या दुसऱ्या टप्प्यातील वाढीव कामांचा प्रस्ताव 2018 साली पुन्हा सर्वसाधारण सभेत मांडण्यात आला. त्यावेळी सुमारे साडे चार हजार चौरस फूट वाढीव क्षेत्रफळाच्या बांधकामासाठी 63 कोटी 63 लाख रुपये खर्चाच मंजूरी देण्यात आली. त्याहूनही कहर म्हणजे हा खर्च झाल्यानंतर रुग्णालयातील अंतर्गत कामांसाठी आणखी 28 कोटी 50 लाख रुपये खर्च प्रस्तावित करण्यात आला असून 7 एप्रिल, 2021 रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत या वाढीव कामालाही वादग्रस्त पद्धतीने मंजूरी देण्यात आल्याची माहिती पेंडसे यांनी पुराव्यांसह दिली आहे. हे रुग्णालय सुरवातीपासून 100 बेडचे होते. त्याचे क्षेत्रफळ वाढल्यानंतरही बेडची संख्या वाढलेली नाही. रुग्णालयाचे मुळ अंदाजपत्रक तयार करताना जेवढा खर्च अपेक्षित होता त्याच्या पाच पटीने खर्च करण्याची मुभा प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कुणी दिली ? तीन टप्प्यात रुग्णालयाचे काम होत असताना त्या तिन्ही कामांच्या निविदा शायोना कॉर्पोरेशन या एकाच कंपनीला कशा काय लागतात ? रुग्णालयाचे काम सुरु होऊन जवळपास सात वर्षे लोटली आहेत. त्यानंतरही हे रुग्णालय लोकांसाठी खुले झालेले नाही, त्याला जबाबदार कोण ? रुग्णालयचे काम संपल्यानंतर तिथला कारभार हाकण्यासाठी पालिकेच्या आरोग्य विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ आहे का, की हे रुग्णला खासगी रुग्णालयांच्या घशात घातले जाणार असे असे अनेक सवाल मृणाल पेंडसे यांनी उपस्थित केले आहेत.

### कंत्राटदारावर कृपाछत्र

पालिका आयुक्तांनी तयार केलेल्या अर्थसंकल्पात या रुग्णालयाच्या 28 कोटींच्या वाढीव खर्चासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. सर्वसाधारण सभेने 31 मार्च पूर्वी मंजूर केलेल्या अर्थसंकल्प पालिकेतील पदाधिकाऱ्यांनी सह्या करून अद्याप प्रशासनाला सादर केलेला नाही. त्यामुळे आयुक्तांच्या अर्थसंकल्पानुसारच सध्या कामकाज सुरु आहे. मात्र, कौसा रुग्णालयाचे काम करणाऱ्या ठेकेदारासाठी नगरसेवकांना अंधारात ठेवून 28 कोटी रुपये खर्चाचा प्रस्ताव आयत्यावेळच्या विषयात घुसडून त्याला प्रशासकीय आणि वित्तीय मान्यता देण्यात आल्याचे मृणाल पेंडसे यांनी उघडकीस आणले आहे. पालिकेच्या अनेक छोट्या मोठ्या ठेकेदारांनी केलेल्या कामांची बिले तिजोरीत पैसै नाही म्हणून पालिका प्रशासनाने रोखून ठेवली आहे. मात्र, कौसा रुग्णालयाचे काम करणाऱ्या ठेकेदारासाठी अशा पध्दतीने रेड कार्पेट का अंथरले जात आहे असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. या कंत्राटदाराला दोन महिन्यांपूर्वी साडे सात कोटी रुपयांचे बिल अदा करण्यात आहे होते. तसेच, नव्याने मंजूर केलेल्या 28 कोटी रुपयांपैकी काही कामांची बिले अदा करण्याचा घाटही अधिकाऱ्यांनी घातल्याचा आरोप पेंडसे यांनी केला आहे.

## भाजपची कार्यपद्धती जनतेच्या हितास मारक

कमी आहे. राज्य सरकारची अडचण झाली असून 50 हजार कोटींचा जीएसटी अद्यापही केंद्राने दिला नसल्याचे त्यांनी सांगितले. कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी राज्य सरकारला कर्ज काढावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले. ईडी, सीआयडी या यंत्रणा पूर्वी माहित नव्हत्या. आता लहान मुलांनासुद्धा ईडी समजायला लागली आहे. या यंत्रणा राष्ट्रीय पातळीवरील असून विघातक प्रवृत्तींना आळा बसविण्यासाठी असाव्यात. मात्र, त्या आता राजकारणासाठी वापरल्या जात असल्याने त्याचे दुष्परीणाम हे निश्चितच होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. हर्षवर्धन पाटील यांचा समाचार घेतांना भाजपमध्ये शांत झोप लागत असल्याचे ते सांगत आहे. परंतु तिकडे गेलेल्या लोकांवर किंवा भाजपमधील नेत्यांवर कारवाई होतांना दिसत नाही, असंच होत आहे. परंतु सरकार कसे कमकुवत होईल, कसे पाडता येईल यासाठी केंद्र सरकाराच्या संस्थांनी कितीही प्रयत्न केला तरी आमचे सरकार भक्कपणे राहणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

राधाकृष्ण विखे पाटील यांनीदेखील आणखी एका नेत्याचा भ्रष्टाचार बाहेर काढणार असल्याचे वक्तव्य केले आहे. परंतु अशा नेत्यांची आता किव येत आहे, मोठ्या आशेने त्यांची किव आली आहे, शपथविधीचे स्वप्न पाहत होते, नवीन कपडेही शिवत होते, आज सरकार पडेल, उद्या सरकार पडले असे वाटत होते, परंतु तसे होत नसल्याने त्यांच्यात नैराश्य आलेले आहे. त्यामुळेच् असे बेताल वक्तव्य केले जात असल्याची टिकाही त्यांनी केली. उद्या रस्त्यावर उतरुन लोकांना दगडं मारले नाही, म्हणजे बर असा टोलाही त्यांनी लगावला आहे. कोरोनाचे संक्रमण कमी झाले असले तरी कोरोना संपलेला नाही. परंतु तरीदेखील हिवाळी अधिवेशन नागपुरला होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी स्व. कांती कोळी यांचे पुत्र मंगेश कोळी, परेश कोळी तसेच काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुभाष कानडे, प्रदेश सचिव मनोज शिंदे, ठाणे शहर अध्यक्ष विक्रांत चव्हाण, इंटकचे जिल्हाध्यक्ष आणि काँग्रेसचे शहर मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे आणि इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## बार सुरू करण्यासाठी रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवत घातला गोंधळ

ठाण्यात कार्यरत आहे. रात्री बारमध्ये गाणे सुरु होते. मद्यधुंद अवस्थेत या सहा लोकांनी अजून गाणे सुरु ठेवा, अशी मागणी बार मॅनेजरकडे केली. बार मॅनेजरने स्पष्टपणे सांगितले बार बंद करण्याची वेळ आहे, तुम्ही बिल भरा आणि निघून जा. हे ऐकताच या सहा जणांनी बारमध्ये धिंगाणा सुरु केला.



जवळपास एक तास हा धिंगाणा सुरु होता. गाणे सुरु करणार नाही तर आम्ही बिल भरणार नाही असे धमकावत हरीश्याम सिंग यांनी आपली रिव्हॉल्वर टेबलावर ठेवत बार मॅनेजरला धमकी देण्यास सुरुवात केली. बिल न भरता सर्व सहाजण बार बाहेर येऊन परत धिंगाणा सुरु केला.

त्वरित याची माहिती कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी या सर्व आरोपींना ताब्यात घेत गुन्हा दाखल केला. आज या सहा जणांना कल्याण रेल्वे कोर्टात हजर केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे. या प्रकरणाचा तपास महात्मा फुले पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी देविदास ढोले हे करीत आहेत.

## जिल्ह्यात रब्बी हंगामाचे क्षेत्र १२ हजार हेक्टरपर्यंत वाढणार

नियोजन केले आहे. 18 ऑक्टोबर 2021 पासून जिल्हा कृषी विभागामार्फत हरभरा प्रमाणित बियाणे वितरण सप्ताह साजरा केला जात आहे. त्यामाध्यमातून हरभरा क्षेत्र विस्तारासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे श्री. माने यांनी सांगितले. कडधान्य विकास कार्यक्रम योजनेअंतर्गत प्रात्यक्षिक घेण्यात येत असून खरीप हंगामात बांधावर तुर लागवडीचा कार्यक्रमाचे 292 हेक्टर क्षेत्रावर प्रात्यक्षिके घेण्यात आलेली असून 62.54 क्विंटल बियाणे वाटप करण्यात आले आहे.

भात पड क्षेत्रात (भाताच्या काढणीनंतर मोकळे असलेले शेत) कडधान्य विकास कार्यक्रम योजनेअंतर्गत रब्बी हंगाम दुबार पिकाची लागवड करण्यासाठी हरभरा पिकाची प्रात्यक्षिके 745 हेक्टर क्षेत्रावर घेण्यात येत आहेत. त्यासाठी 447 क्विंटल बियाणांचा पुरवठा तालुका स्तरावर करण्यात आलेला आहे. भात पड क्षेत्रावर गळितधान्य पिकाची लागवडीसाठी जिल्हयात 162 हेक्टर क्षेत्रावर भुईमुग पिकाची प्रात्यक्षिके घेण्यात येणार असून 97 क्विंटल भुईमुग बियाणे वाटप करण्यात येणार आहे, असेही श्री. माने यांनी सांगितले.

भात पिकाच्या काढणीनंतर उर्वरित अंश ओलीवर कडधान्य पिकाची लागवड करणेसाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त केले जात आहे. त्याबरोबरच गत वर्षी हरभरा बियाणे वाटप केलेल्या शेतकऱ्यांना क्षेत्र लागवडीखाली आणण्यासाठी प्रवृत्त केले जात आहे.

## ठाण्यात वैफल्यग्रस्त सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याची आत्महत्या

वर्षापूर्वी निवृत्त झालेले साळूंखे हे वागळे इस्टेट , श्रीनगर भागात वास्तव्याला होते. गेल्या काही महिन्यांपासून वैफल्यग्रस्त असलेले साळुंखे तीन दिवसांपूर्वीच घरातून बेपत्ता झाले होते. मंगळवारी सकाळी 11 वाजण्याच्या सुमारास येऊरच्या जंगलात त्यांनी एका खांबाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती वर्तकनगर पोलिसांना मिळाली. त्यांच्या पॅन्टच्या खिशातील ओळखपत्राच्या आधारे त्यांची ओळख पटली. त्यांनतर त्यांच्या कुटूंबीयांनीही हा त्यांचा मृतदेह असल्याचे सांगितले. ते दारुच्याही आहारी गेले होते. त्यांच्या मागे पत्नी , मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नसल्याचे पोलीस उपायुक्त डॉ. विनय राठोड यांनी सांगितले.

## मुस्लीम आणि दलितांची नावे मतदार याद्यांमधून गायब?

मतदारसंघातील अनेक मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली असल्याचा प्रकार उघडकीस येत आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी हा गौप्यस्फोट केला आहे. डॉ. आव्हाड यांनी सांगितले की, महापालिका निवडणुकांच्या आधी फक्त मुंब्रा-कळव्याच्याच नव्हे तर सबंध महाराष्ट्राच्या मतदार याद्यांमध्ये प्रचंड गोंधळ आहे. मुंब्रा येथे 20 ते 30 हजार मतदारांची नावे कापण्यात आलेली आहेत. त्यासाठी स्थलांतरण असा शेरा मारण्यात आलेला असला तरी सद्यस्थितीमध्ये ते मतदार त्याच ठिकाणी वास्तव्यास आहेत. ही नावे वगळण्यामागे जबाबदार कोण आहे, याचा विचार केल्यास ही जिल्हाधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली हे काम होत असते. म्हणून आमची मागणी आहे की, मतदार याद्यांची फेरतपासणी करावी आणि जे चुकीच्या पद्धतीने स्थलांतरीत दाखविण्यात आलेले आहेत. ते स्थलांतरण रद्द करुन संबधित मतदारांना पूर्ववत यादीमध्ये समाविष्ट करावे, अशी सूचना आव्हाड यांनी केली आहे.

संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकारच काढून घेण्याचा प्रयत्न प्रशासकीय अधिकारी करीत आहेत. देशातील मतदार याद्या आधार कार्डशी लिंक करण्यात याव्यात म्हणजे मतदारांचा राहण्याचा पत्ता आणि फोटो अद्ययावत मिळेल, अशी मागणी डॉ.आव्हाड यांनी केली आहे.

## वागळे-मुंब्र्यात शून्य रुग्ण

दोन, उथळसर आठ, कळवा एक, दिवा एक तर मुंब्रा आणि वागळे प्रभागात एकही रुग्ण आढळला नाही.

विविध रुग्णालयात आणि घरी उपचार घेत असलेल्या रुग्णांपैकी 67जण कोरोनामुक्त झाले आहेत. आत्तापर्यंत एक लाख 37 हजार 700जण ठणठणीत बरे होऊन घरी गेले आहेत तर रुग्णालयात आणि घरी 619जणांवर उपचार सुरु आहेत. आज एकाही रुग्णाचा मृत्यू झाला नसून आत्तापर्यंत दोन हजार 93जण दगावले आहेत.

महापालिका प्रशासनाने काल शहरातील एक हजार 908 नागरिकांची कोरोना चाचणी घेतली होती. त्यामध्ये 50जण बाधित मिळाले आहेत. आत्तापर्यंत 20 लाख 34 हजार 19 ठाणेकरांची चाचणी घेण्यात आली असून त्यामध्ये एक लाख 40 हजार 412जण बाधित मिळाले आहेत.

## एअरटेल मोबाईल टॉवरसाठी लाखोंची वीजचोरी

टेलेमॅटिक्स विरुद्ध महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

वीजचोरी शोध मोहिमेत शिवाजी चौक शाखा एकचे सहायक अभियंता मोहम्मद आरिफ शब्बीर खान, कर्मचारी विलास गायकवाड यांच्या पथकाने 8 ऑक्टोबर रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सी टाइप इमारतीच्या छतावरील मोबाईल टॉवरच्या वीज पुरवठ्याची तपासणी केली. या ठिकाणी अधिकृत वीजजोडणी न घेता विनामीटर थेट वीजवापर होत असल्याचे आढळले. सुयोग टेलेमॅटिक्सने एअरटेल मोबाईल टॉवरसाठी काळ्या रंगाची 40 मीटर केबल वापरुन फिडर पिलरमधून थेट व अनधिकृतपणे वीजचोरी केल्याचे तपासणीतून उघड झाले.

18 मे पासून वीज चोरीचा हा प्रकार सुरु असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार वीज चोरीचे देयक व दंड भरण्याबाबत सुयोग टेलेमॅटिक्सला नोटीस बजावण्यात आली. परंतु संबंधित रकमेचा भरणा न झाल्याने सुयोग टेलेमॅटिक्स विरुद्ध सहायक अभियंता खान यांनी फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन महात्मा फुले चौक पोलिसांनी वीज कायदा 2003 च्या कलम 135 नुसार सुयोग टेलेमॅटिक्स विरुद्ध वीजचोरी गुन्हा दाखल केला आहे.

# दहावी व बारावी पुरवणी परीक्षेचा निकाल बुधवारी

**मुंबई:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सप्टेंबर-ऑक्टोबर 2021 मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. दहावी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. बारावी) पुरवणी परीक्षेचा निकाल बुधवार, दि. 20 ऑक्टोबर 2021 रोजी दुपारी एक वाजता जाहीर करण्यात येत असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांनी दिली आहे.

हा निकाल www.mahresult.nic.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार असून या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांचे विषयनिहाय गुण उपलब्ध होतील.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापुर अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत इ. दहावीची पुरवणी परीक्षा 22 सप्टेंबर, 2021 ते 8 ऑक्टोबर 2021 व इ. बारावीची पुरवणी परीक्षा 16 सप्टेंबर 2021 ते 12 ऑक्टोबर 2021 या कालावधीत आयोजित करण्यात आली होती.

ऑनलाईन निकालानंतर लगेचच दुसऱ्या दिवसापासून इ. दहावी व इ. बारावी पुरवणी परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयाव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रत, पुनर्मूल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्रासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन इ. दहावीसाठी http://verification.mh-ssc.ac.in व इ. बारावीसाठी http://verification.mh-hsc.ac.in स्वतः किंवा शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी/ शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत. गुणपडताळणीसाठी गुरुवार 21 ऑक्टोबर 2021 ते शनिवार 30 ऑक्टोबर 2021 पर्यंत व छायाप्रतीसाठी गुरुवार, 21 ऑक्टोबर 2021 ते मंगळवार 9 नोव्हेंबर 2021 पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येईल. त्यासोबतच ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरता येईल.

सप्टेंबर-ऑक्टोबर 2021 पुरवणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छाया प्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपद्धतीचा अवलंब करून विहीत नमुन्यात विहीत शुल्क भरून संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

सन 2022 मधील इ. दहावी व इ. बारावी परीक्षेस ज्या विद्यार्थ्यांना प्रविष्ट व्हावयाचे आहे अशा पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ट होणारे व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांद्वारे ट्रान्स्फर ऑफ क्रेडीट घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्र ऑनलाईन पद्धतीने स्विकारली जातील. त्याच्या तारखा मंडळामार्फत स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येतील.

सन 2021 मध्ये प्रथम नोंदणी करून परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्याची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणी गुणसुधार योजनेअंतर्गत परीक्षेस पुनःश्च प्रविष्ट होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यानुसार सप्टेंबर-ऑक्टोबर 2021 च्या इ. दहावी व इ. बारावी परीक्षेस सर्व विषय घेऊन प्रथमच उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी तरतुदीच्या अधीन राहून पुढील सलगच्या दोन संधी उपलब्ध राहतील. सन 2022 मधील परीक्षेसाठी नोव्हेंबर-डिसेंबर 2020, सन 2021 अथवा सप्टेंबर-ऑक्टोबर 2021 मधील परीक्षेमध्ये एकाच वेळी सर्व विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच श्रेणी सुधार योजनेंतर्गत आवेदन पत्र भरुन परीक्षेस प्रविष्ट होता येणार आहे. त्यामुळे त्यापूर्वीचे असे उत्तीर्ण विद्यार्थी अथवा कोणताही पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी यांना श्रेणीसुधार योजनेंतर्गत परीक्षेस प्रविष्ट होता येणार नाही, असे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे सचिव डॉ.अशोक भोसले यांनी कळविले आहे.

# सुमन अग्रवाल यांचे सामाजिक कार्य कौतुकास्पद- नाना पटोले

**मुंबई:** समाजसेविका व काँग्रेस नेत्या सुमन अग्रवाल यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान अत्यंत कौतुकास्पद आहे आणि अशा कार्यामुळेच समाजाचा विकास होतो, असे गौरवोद्गार इंटरनॅशनल मारवाडी फेडरेशनच्या माध्यमातून नरिमन पॉईंट, मुंबई येथे उभारण्यात आलेल्या पाणपोईच्या उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष व आमदार नाना पटोले यांनी काढले. या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित होते.




संस्थेच्या अध्यक्षा सुमन अग्रवाल यांच्या दिवंगत मातोश्री गीतादेवी बन्सीधर अग्रवाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारण्यात आलेल्या या सुंदर पाणपोईच्या उद्घाटन समारंभात प्रास्ताविकात 1988 साली स्थापना झालेल्या इंटरनॅशनल मारवाडी फेडरेशन या संस्थेची माहिती देण्यात आली. आतापर्यंत सातत्याने अनेक लोककल्याणकारी कार्य करण्यात आले असून नरिमन पॉईंट या ठिकाणी असलेल्या बेस्टचे बस स्थानकासह विविध कार्यालयात ये-जा करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना, टॅक्सीचालक, सुरक्षारक्षक आदी लोकांना थंडगार पिण्याचे पाणी सहजपणे व मोफत उपलब्ध होऊ शकेल, म्हणून संस्थेच्यावतीने सदर ठिकाणी या पाणपोईची व्यवस्था केली आहे.

या पाणपोईचे अतिशय चांगल्या पद्धतीने सुशोभीकरण करण्यात आले असून त्याकामी सरकार ग्रुपचे पवन गुप्ता यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे. सोहळ्यात आमदार व महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या हस्ते या पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी श्री. पटोले यांचे स्वागत केले. कार्यक्रमात सुप्रसिद्ध चार्टर्ड अकाउंटंट सुनील पाटोदिया, भवननिर्माते किशोर खाबिया, हिंदुस्तान चैम्बर ऑफ कॉमर्सचे पेट्रोन सदस्य डॉ. उत्तम जैन, रोटरीचे डिस्ट्रिक्ट गवर्नर डॉ. राजेंद्र अग्रवाल, एनएसयुआईचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस संदीप पांडे, विनर बिंद्रा, अजय अग्रवाल, भिवंडी बिल्डर असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रप्रकाश कुमावत, रामप्रकाश अग्रवाल, आकाश अग्रवाल, एमपीआईएलचे कैलाश गोयल, महेश अग्रवाल, विनीता पटोदिया, बबिता मित्तल, दीपक गुप्ता, वीरेंद्र मित्तल, सीमा पारीक, संतोष आडुकिया, उषा पित्ती, रंजना गुप्ता, किशन बिश्नोई आदी उपस्थित होते.



**आमदार संजय केळकर यांच्या आमदार निधीतून वृत्तपत्र विक्रेते यांच्याकरिता निवाराशेड गावदेवी, ठाणे येथे बांधण्यात येत आहे. वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त त्याचे भूमिपूजन आ. केळकर यांच्या हस्ते झाले. यावेळी स्थानिक ज्येष्ठ नगरसेवक संजय वाघुले, नगरसेवक सुनेश जोशी, डॉ. राजेश मढवी, वृत्तपत्र विक्रेते संघाचे दत्ता घाडगे आदी उपस्थित होते.**

## ...अन्यथा खर्डी एमआयडीसी प्रकल्प माघारी घ्या-भरत उबाळे

**कसारा:** राज्य शासन शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अन्यायाची भूमिका घेत आहे. तालुक्यातील खर्डी येथील एमआयडीसीचा प्रकल्प एक तर राज्य शासनाने माघारी घ्यावा अन्यथा देय असलेला मोबदला द्यावा, अशी रोखठोक भूमिका विधायक क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भरत उबाळे यांनी मांडली आहे.

शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नावर येथील राजकीय पुढारी मौन का बाळगून आहेत, असा प्रश्न भरत उबाळे यांनी उपस्थित केला आहे. या प्रश्नात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हेच मार्ग काढू शकणार असल्याने त्यांची शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासोबत भेट घेणार असल्याचे उबाळे यांनी सांगितले.

2018 मध्ये महाराष्ट्र ओद्योगिक विकास महामंडळाने तालुक्यातील खर्डी विभागातील पाच गावांमध्ये 750 एकर क्षेत्र भूसंपादीत केले आहे. त्यावेळी 500 कोटींचा मोबदला वाटप केला होता. तो बाधीत शेतकऱ्यांपैकी काहींना त्यावेळी देण्यात जाणीवपूर्वक घाई करण्यात आली. मात्र त्यानंतर गेल्या तीन वर्षांपासून उर्वरित स्थानिक शेतकऱ्यांना सूमारे 400 कोटी रुपये देणे असलेला मोबदला अद्याप देण्यात आलेला नाही. मोबदला रखडलेला खर्डीतील एमआयडीसीचा हा प्रकल्प राज्य शासनाने एक तर माघारी बोलवावा अन्यथा शेतकऱ्यांना देय असलेला मोबदला द्यावा, अशी मागणी भरत उबाळे यांनी केली आहे.

## डोंबिवली रिपाइंच्या वतीने धम्मचक्र परिवर्तन दिन उत्साहात साजरा

**डोंबिवली :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने डोंबिवली येथे धम्मचक्र परिवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.




डोंबिवली येथील रामनगर संपर्क कार्यालयात रिपाइंचे डोंबिवली शहर अध्यक्ष अंकुश गायकवाड यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन डोंबिवलीतील आंबेडकरी समाज आणि नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

जगाला बुध्द धम्म तारु शकतो, असे त्यांनी आपल्या छोटेखानी भाषणात सांगितले. डोंबिवलीत इंदिरा नगर, डोंबिवली पश्चिमेला तसेच अनेक ठिकाणी भेट देऊन नागरिकांना अध्यक्ष गायकवाड यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांच्या समवेत शहर सचिव दिनेश साळवे, सहसचिव समाधान तायडे, उपाध्यक्ष अँड.सुभाष अंबुरे, संघटक डॉ. संदिप पाईकराव, संपर्क प्रमुख धम्मपाल सरकटे, वार्ड अध्यक्ष तेजस जोंधळे, मंगेश कांबळे, चंद्रकांत वाढवे उपस्थित होते.

# आंबिवलीतील आरक्षित भुखंडावरील मैदानात दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर रगंला कबड्डीचा थरार





**कल्याण :** कल्याण-डोंबिवली मनपाच्या सौजन्याने लोकसहभागातून अवघ्या दहा दिवसांत कबड्डीची दोन क्रिडांगणे साकारण्यात आली आहेत. दसऱ्याच्या दिवशी आंबिवलीतील या आरक्षित भुखंडावर कबड्डीचा थरार रंगल्याने खेळाडूसह कबड्डी शौकीनांचा आनंद द्विगुणित झाला.

कल्याण-डोंबिवली मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दसऱ्याच्या आधी आंबिवली येथील स्वराज्य गृहसंकुलालगत असलेल्या मनपाच्या आरक्षित भुखंडावर वृक्षारोपण केले. ग्रामीण "अ" प्रभागातील कबड्डीपट्टूचे गतवैभव पुनश्च प्राप्त होण्यासाठी कबड्डीची नामशेष होत असलेली मैदानाची संख्या पाहता कबड्डीचे मैदान होणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरून आजच्या तरुणाईला व्यायामासह मैदानी खेळाची गोडी निर्माण होईल आणि उत्कृष्ट कबड्डी खेळाडू तयार होतील. या दृष्टीकोनातून अ प्रभागक्षेत्र आधिकारी राजेश सावंत यांना कबड्डीची क्रिंडागणे येत्या दहा दिवसांत तयार करण्याबाबत सुचना केल्या.

अ प्रभागक्षेत्र राजेश सावंत यांनी माजी राज्य कबड्डीपट्ट प्रकाश पाटील यांच्याशी संपर्क साधत लोकसहभागातून कुठलाही निधी न वापरता दोन भव्य अशी कबड्डीची क्रिंडागणे साकारली आणि दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर या मैदानावर माहिला, पुरुष गटाचे कबड्डी सामान्याचा खेळाचे उद्घाटन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.

सहभागी झालेल्या जयदुर्गा क्रिडा मंडळ अ, ब गट अटाळी, अजिंक्य क्रिडा मंडळ आंबिवली, संघर्ष मित्र मंडळ या संघातील खेळाडूनी आपल्या चढाई मधुन खेळाचे कसब दाखवित उपस्थितांना कबड्डी खेळाचा थरार अनुभव दिला. या चुरशीच्या कबड्डी सामान्यात जयदुर्गा क्रिडा मंडळ यांनी विजेते पदाचा चषक प्राप्त केला. तर उपविजेता संघ संघर्ष मित्र मंडळ ठरला माहिला कबड्डी संघाच्या सामान्यात संघर्ष क्रिडा संस्था संघावर मात करीत ज्ञान शक्ति युवा संस्था कल्याण यांनी बाजी मारीत चषक पटकविला. स्थानिक कबड्डी चे होतकरु खेळाडू नी याप्रसंगी प्रशासनाने कबड्डी मैदान साकारल्याबाबत धन्यवाद मानले.

'ठाणेवैभव' हे दैनिक मालक-मुद्रक-प्रकाशक मिलिन्द बल्लाळ यांनी मिड-डे इन्फोमिडिया लि., R/847/3, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी रबाळे, नवी मुंबई-४००७०१. महाराष्ट्र येथे छापून दामले अपार्टमेंट, टेंभीनाका, ठाणे (प) महाराष्ट्र -४००६०१ येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी नं. २५३४१५२६,२५३४८५९४ Email : thanevaibhav1975@gmail.com

# मुजोर रिक्षाचालकांसाठी वाहतूक पोलीस, परिवहन, रेल्वे सुरक्षा दल यांचा संयुक्त आराखडा

**ठाणे :** ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील काही रिक्षाचालकांची मुजोरी वाढली असून त्यांच्याकडून वारंवार नियमांचे उल्लंघन केले जाते. अशा बेशिस्त रिक्षाचालकांना वठणीवर आणण्यासाठी ठाणे वाहतूक पोलिसांनी परिवहन विभाग, लोहमार्ग पोलीस, ठाणेनगर पोलीस आणि रेल्वे सुरक्षा दलासोबत एक संयुक्त आराखडा तयार केला आहे. येत्या पाच ते सहा दिवसात त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

प्रवाशांना तात्काळ रिक्षा, बसगाड्या उपलब्ध व्हाव्यात यासाठी ठाणे महापालिकेने सॅटिस पुलावर टीएमटी बसगाड्यांचा थांबा तर सॅटिस पुलाखाली रिक्षाथांबा सुरु केला आहे. येथे प्रवासी रांगेत उभे राहून थांब्यावरील रिक्षामध्ये बसून प्रवास करतात. गेल्या काही महिन्यांपासून रिक्षाचालकांनी प्रवाशांची लूटमार करण्यास सुरुवात केली आहे. काही रिक्षाचालक सॅटिस पुलाखालील थांबा सोडून स्थानक परिसरात कुठेही रिक्षा उभ्या करतात. त्यानंतर हे रिक्षा



### आराखडा काय?

**ठाणेनगर पोलिसांकडून सॅटिस पुलावर चार ते पाच अधिकारी-कर्मचारी नेमण्यात येणार आहेत. ठाणे स्थानकाच्या आवारात येणाऱ्या रिक्षाचालकांना रोखण्यासाठी लोहमार्ग आणि रेल्वे सुरक्षा दलाचे 20 कर्मचारी नेमले जाणार आहे. थांबे सोडून वेड्यावाकड्या पद्धतीने उभ्या असलेल्या रिक्षाचालकांना आवर घालण्यासाठी तसेच रिक्षा थांब्याच्या पुढे जाणार नाही यासाठी वाहतूक पोलिसांचे एक साहाय्यक पोलीस निरीक्षक आणि सहा कर्मचारी असणार आहेत. बोगस रिक्षाचालकांविरोधात परिवहन विभागाचेही दोन कर्मचारी या ठिकाणी तैनात केले जाणार आहे.**

चालक स्थानक परिसरात चालत जाऊन घोडबंदर, मीरा-भाईंदर, हिरानंदानी येथील प्रवाशांना हेरुन त्यांना रिक्षात बसवतात. तसेच या भागात जाण्यासाठी त्यांच्याकडून जादा रिक्षाभाडे आकारत आहेत. अनेकदा महिलांशीही हे रिक्षाचालक गैरवर्तन करतात.

पोलिसांनी अखेर प्रवाशांच्या समस्येची दखल घेत गुरुवारी दुपारी वाहतूक शाखेचे उपायुक्त बाळासाहेब पाटील यांच्या दालनात बैठक आयोजित केली होती.या बैठकीस वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांसह लोहमार्ग पोलीस, ठाणेनगर पोलीस आणि रेल्वे सुरक्षा दलाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रशासनाने या रिक्षाचालकांवर कारवाई करण्यासाठी आराखडा तयार केला. येत्या चार ते पाच दिवसांत आणखी नियोजन करून स्थानक परिसरातील ही समस्या सोडविण्यात येईल, असा दावा पोलिसांकडून केला जात आहे. या नियोजनामुळे बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाई होणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# पाणीटंचाईच्या निषेधार्थ मीरा-भाईंदरमध्ये शिवसेनेचे 'घागर फोडा' आंदोलन



**मीरारोड :** मीरा भाईंदर मधील पाणी टंचाईला सत्ताधारी भाजपा व प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप करत शिवसेनेने शहरातील 2 पालिका प्रभाग समिती कार्यालयां बाहेर मातीच्या घागरी फोडत निषेध केला.

शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांनी शहरातील पाणी टंचाईला सत्ताधारी भाजपा आणि त्यांचे काही नेते व प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप करत सोमवारी आंदोलन करण्याचे जाहीर केले होते. त्या अनुषंगाने आज सोमवार 18 ऑक्टोबर रोजी शिवसेनेच्या वतीने महापालिकेच्या भाईंदर पश्चिम, नगर भवन येथील प्रभाग समिती कार्यालय व मीरारोडच्या शांती नगर, इंदिरा गांधी रुग्णालयातील प्रभाग समिती 5 च्या कार्यालया बाहेर मातीच्या घागरी फोडून सत्ताधारी भाजपाचा पाणी टंचाई बद्दल निषेध केला.

मीरारोड येथे प्रभाग अधिकारी चंद्रकांत बोरसे यांना मातीची रिकामी घागर व निवेदन दिले गेले. त्या आधी महिला उपजिल्हा संघटक सुप्रिया घोसाळकर व उपजिल्हा प्रमुख तथा नगरसेवक राजू भोईर व विक्रमप्रताप सिंह यांच्यासह शहरप्रमुख प्रशांत पालांडे, शहर संघटक श्रेया साळवी, दिलीप भोईर, सलमान हाश्मी, स्वाती देसाई, क्षमा गांधी, वीणा बद्रिके, रसिका पवार, सीमा रनवडे, सुभाष केसरकर आदी पदाधिकारी व शिवसैनिक आदींनी बाहेर घागरी फोडून भाजपा व प्रशासनाचा निषेध करत घोषणाबाजी केली.

भाईंदर पश्चिम येथील नगरभावन प्रभाग समिती 2 समोर उपजिल्हाप्रमुख संदीप पाटील, शहरप्रमुख पप्पू भिसे, उपशहर प्रमुख शब्बीर कुरेशी, जितेंद्र पाठक, भगवान शर्मा, प्रमिला लाडे आदींसह शिवसैनिकांनी घागरी फोडून निषेध केला व घोषणा दिल्या. उर्वरित भाईंदर पूर्व प्रभाग समिती 3, पूर्व व कनकिया समिती क्र. 4 आणि महामार्ग परिसर व मीरारोड प्रभाग समिती 6 च्या कार्यालयां समोर बुधवारी शिवसेना आंदोलन करणार आहे असे शहरशाखेच्या वतीने सांगण्यात आले.

# परतीच्या पावसामुळे भाज्यांचे मोठे नुकसान, दर वधारले

**ठाणे :** काही दिवसांपूर्वी झालेल्या परतीच्या पावसामुळे भाजीपाल्याच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून बाजारात 50 टक्क्यांनी भाज्यांची आवक घटली आहे. त्यामुळे मागील काही दिवसांपासून घाऊक आणि किरकोळ बाजारात भाज्यांच्या दरात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. किरकोळ बाजारात भाज्यांचे दर ऐंशीपार गेले आहेत.

राज्यातील काही भागांत झालेल्या परतीच्या पावसामुळे भाज्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यासह



विक्रीसाठी तयार झालेल्या भाज्याही या पावसात खराब झाल्या आहेत. परिणामी ठाणे, मुंबई तसेच उपनगरांतील किरकोळ बाजारात भाज्यांची आवक 50 टक्क्यांनी घटली असल्याची माहिती काही किरकोळ विक्रेत्यांनी दिली. भाज्यांची आवक घटल्यामुळे भाज्यांचे दर हे ऐंशीपार पोहोचले आहेत. या पावसामुळे सर्वाधिक नुकसान पालेभाज्यांच्या पिकांचे झाले आहे. सद्य:स्थितीला बाजारात पालेभाज्या अगदी कमी प्रमाणात दिसून येत आहेत. त्यामुळे पालेभाज्यांचे दरही गगनाला भिडले आहेत. सध्या किरकोळ बाजारात मेथीची जुडी 50 रुपयाने, पालक जुडी 40 रुपयाने आणि शेपूची जुडी 25 रुपयाने विक्री केली जात आहे. कोंथबीरची जुडी सध्या शंभर रुपयाने विक्री करण्यात येत असल्यामुळे अनेक भाजीवाल्यांच्या गाडीवरुन कोथिंबीर नाहीशी झाली आहे.

**परतीच्या पावसामुळे भाज्यांच्या पिकांचे नुकसान झाले असून त्यांची आवकही घटली आहे. काही भाज्यांनी शंभरी पार केली आहे.**

**- किरकोळ विक्रेते, ठाणे**



# दिवाळीनिमित्त बाजारपेठा ग्राहकांसाठी सज्ज

**ठाणे :** दिवाळी सण अवघ्या पंधरा दिवसांवर येऊन ठेपला असल्यामुळे बाजारपेठा ग्राहकांसाठी सज्ज झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू तसेच वाहन खरेदीच्या दुकानात ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विविध सवलती देण्यात आल्या आहेत. मागील वर्षी करोना प्रादुर्भावामुळे सर्वच सण-उत्सव साध्या पद्धतीने साजरे करावे लागले होते. मात्र, यंदाच्या वर्षी करोना प्रादुर्भाव कमी झाला असून राज्य सरकारने निर्बंधांमध्ये शिथिलता आणली. यामध्ये सर्व बाजारपेठा रात्री 10 वाजेपर्यंत खुल्या ठेवण्यास परवानगी मिळाली. ऐन सण-उत्सवाच्या कालावधीत बाजारपेठा खुल्या झाल्यामुळे ठाणे शहरातील जांभळीनाका, गावदेवी, नौपाडा या भागांत सायंकाळच्या वेळी नागरिकांची खरेदीसाठी गर्दी पाहायला मिळत आहे. यामुळे व्यापारी वर्गातही आनंदाचे वातावरण आहे.

दिवाळी सण हा सर्वच सण-उत्सवामध्ये महत्त्वाचा मानला जातो. रोषणाईचा सण म्हणून या सणाची ओळख आहे. या सणाच्या दहा ते पंधरा दिवस आधीपासून बाजारात उत्साहाचे वातावरण असते. दरवर्षी या सणानिमित्त बाजारात नवनवीन प्रकारचे कपडे, कंदील, रोषणाईचे साहित्य, पणत्या, घर सजावटीचे साहित्य बाजारात विक्रीसाठी दाखल होत असतात. मागील वर्षी दिवाळी सणावरही करोनाचे सावट असल्यामुळे बाजारपेठांमध्ये शुकशुकाट पाहायला मिळाला होता. यंदाच्या वर्षी करोनाचा प्रादुर्भाव ओसरल्यामुळे बाजारपेठ पूर्ण वेळ सुरु ठेवण्यास परवानगी मिळाली आहे. त्यामुळे बाजारात चैतन्याचे वातावरण दिसून येत आहे. ठाणे शहरातील बाजारपेठ कपडे खरेदीसाठी मुख्य मानली जाते. या बाजारात सकाळ-संध्याकाळ ग्राहकांची गर्दी असते. या बाजारात यंदा दिवाळीनिमित्त महिलांसाठी कपडय़ांमध्ये कुर्ता विथ प्लाझो, कुर्ता विथ हेवी दुपट्टा, कुर्ता विथ पॅण्ट आणि दुपट्टा ह नवा ट्रेंड आला आहे. तर, पुरुषांसाठी विविध रंगांमध्ये प्लेन तसेच डिझाइनर शॉर्ट आणि लाँग कुर्ते विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. तसेच महिलांसाठी साडय़ांमध्येही नवनवीन प्रकार विक्रीसाठी उपलब्ध झाल्याचे पाहायला मिळत आहे. ग्राहकांना दुकानात आल्यावर प्रसन्न वाटावे यासाठी व्यापाऱ्यांनी दुकानाच्या प्रवेशद्वारावर तसेच आतमध्ये आकर्षित अशी फुलांची तसेच फुग्यांची सजावट केली आहे. तसेच ग्राहकांना कपडे खरेदीवर विविध सवलती देण्यात येत आहेत.

दिवाळीच्या कालावधीत इलेक्ट्रॉनिक वस्तू तसेच वाहन खरेदीला विशेष महत्त्व दिले जाते. यामुळे या वस्तूंच्या दुकानातही ग्राहकांना आकर्षित करतील अशा सवलती देण्यात आल्या आहेत. जुन्या वस्तू द्या शून्य डाऊनपेमेंटवर नवीन वस्तू घ्या, लोनवर फोन अशा सवलतींचे फलक तसेच स्टिकर बाजारातील इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या दुकानाबाहेर लावले असल्याचे दिसून येत आहेत. तर, वाहन खरेदीवरही विविध प्रकारच्या सवलती देण्यात आल्या आहेत. या सवलतींमुळे ग्राहकांचीही खरेदीसाठी दुकानात गर्दी होत आहे. त्यासह, दिवाळीनिमित्त लागणाऱ्या पणत्या, कंदील, विद्युत रोषणाई, घर सजावटीच्या वस्तू यामध्येही नवनवीन प्रकार विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. या वस्तू खरेदी करण्यासाठी ग्राहकांची सकाळ-संध्याकाळ ठाणे शहरातील बाजारात झुंबड उडत असल्याचे चित्र आहे.

# बिबट्याबाबतची अनावश्यक नकारात्मकता टाळायला हवी

**बदलापूर :** गेल्या काही दिवसांपासून बदलापूर शहराच्या आसपासच्या परिसरात बिबट्याच्या वावरामुळे नागरिकांमध्ये नकारात्मक वातावरण तयार झाले आहेत. यामुळे बिबट्याच्या अधिवासाला आपण धोका निर्माण करत आहोत. बिबट्याबाबतची अनावश्यक नकारात्मकता टाळायला हवी. जंगलातील प्राणीसाखळी सुस्थितीत राहण्यासाठी बिबट्या अपरिहार्य आहे, असा सूर वन संरक्षक, मानद वनजीवरक्षक आणि वन विभागाच्या संयुक्त बैठकीत प्राणिमित्रांनी लावला. बिबट्याबाबत नागरिकांत प्रबोधन करण्यासाठी वनविभाग पुढाकार घेत असून लवकरच अनुभवी आणि तज्ज्ञ व्यक्तींना पाचारण केले जाणार असल्याचे वन विभागाने सांगितले.

गेल्या आठवड्यात बदलापूर शहरातील कात्रपजवळील डोंगरावर बिबट्याचा वावर असल्याचे यापूर्वीच स्पष्ट झाले आहे. मात्र बिबट्याचा असण्यामुळे मानवी वस्तीला धोका आहे, अशी नकारात्मक चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरु आहे. बिबट्याबाबतची नकारात्मकता कमी करण्यासाठी नुकतेच वन विभागाने पुढाकार घेऊन एका संयुक्त बैठकीचे आयोजन केले होते. बदलापूर वन परिक्षेत्र कार्यालयात ही बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्ह्यातील मानद वन्यजीव रक्षक अविनाश हरड, जिल्ह्याचे उप वनसंरक्षक तुळशीराम हिरवे यांसह प्राणिप्रेमी उपस्थित होते. यावेळी बिबट्याबाबतची वाढलेली नकारात्मकता कमी करण्यासाठी सर्व प्राणिप्रेमींना पुढाकार घ्यायला हवा, असा सूर सर्वांनी लावला. ज्या नागरी वस्तीच्या शेजारील वनात बिबट्याच्या खुणा आढळल्या आहेत, त्या भागातील नागरिकांची जनजागृती केली जाईल, असे हिरवे यांनी सांगितले.

# कल्याण-डोंबिवलीत बेकायदा बांधकामांचा पाणीपुरवठा बंद; महापालिकेचा निर्णय

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली पालिका हद्दीत बेकायदा बांधकामांना पालिकेच्या मुख्य जलवाहिन्यांवरुन चोरुन पाणीपुरवठा होत असल्याने अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होत आहे. हे गैरप्रकार रोखण्यासाठी शहरातील बेकायदा बांधकामांना नळजोडण्या मंजूर करण्यात येऊ नयेत, असे आदेश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत.

आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी महावितरणच्या मुख्य अभियंत्यांना पत्र लिहून कल्याण-डोंबिवली शहरातील बेकायदा बांधकामांना वीजपुरवठा देऊ नका, असे पत्र दोन महिन्यांपूर्वी पाठविले होते. त्यापाठोपाठ आता त्यांनी या बांधकामांचा पाणीपुरवठा बंद करण्याचे आदेश काढले आहेत. या आदेशाची अंमलबजावणी पाणीपुरवठा विभागाने सुरु केली आहे. बेकायदा बांधकामांसाठी चोरुन नळजोडण्या घेतल्या असतील तर त्या तोडून टाकाव्यात, असे आदेश आयुक्तांनी पाणीपुरवठा प्रभाग अधिकाऱ्यांना दिले.

टिटवाळा, मोहने, आंबिवली, कल्याण पूर्व, डोंबिवली पूर्व, 27 गावे आणि डोंबिवली पश्चिमेत सर्वाधिक बेकायदा बांधकामे सुरु आहेत. राखीव भूखंड, सरकारी, विविध आस्थापनांच्या जागा भूमाफिया बांधकामासाठी हडप करत आहेत. पालिका हद्दीतील बेकायदा बांधकामांची संख्या सुमारे दोन लाख 35 हजार आहे. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी पालिकेने बेकायदा बांधकामांचा पाणीपुरवठा तोडण्याचा निर्णय घेतला आहे.



> **अनधिकृत बांधकामांमुळे रस्ते, वाहनतळ, वीज या पायाभूत सुविधांवर ताण येत आहे. शहराला होणारा पाणीपुरवठा मर्यादित स्वरूपाचा असल्याने अनधिकृत बांधकामांना पाणीपुरवठा केल्यास पाणीटंचाई उग्र होण्याची भीती आहे. अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी हा निर्णय घेतला आहे.**
>
> **— डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, महापालिका**

शासनाच्या आदेशाप्रमाणे 1995 च्या नंतरच्या अनधिकृत बांधकामांना महापालिकेकडून नळजोडणी मंजूर केली जात नव्हती. मात्र भूमाफिया पालिकेच्या मुख्य जलवाहिनीवरुन चोरुन नळजोडणी घेत होते. पालिका हद्दीत 40 हजार बेकायदा नळजोडण्या असल्याचा आरोप शिवसेनेचे माजी नगरसेवक कैलास शिंदे यांनी 10 वर्षांपूर्वी महासभेत केला होता. ही संख्या आता एक लाखाच्या पुढे गेली आहे. तत्कालीन नगरसेवकांनी 22 जानेवारी 2014 च्या महासभेत 1995 पूर्वी आणि त्यानंतरच्या सर्व अनधिकृत बांधकामांना, बांधकामाचे पुरावे नसलेल्या अशा मालमत्तांचा प्रशासनाने स्वतंत्र संवर्ग तयार करावा. अशा बांधकामांना अडीचपट दराने नळजोडण्या मंजूर कराव्यात, असा ठराव मंजूर केला होता. या ठरावाचा आधार घेऊन पाणीपुरवठा विभागाने मागील सात वर्षांत सर्व बेकायदा बांधकामांना नळजोडण्या मंजूर केल्या. त्याचा परिणाम नागरी वस्तीमधील पाणीपुरवठ्यावर होत आहे.

# माथेरानचा विकास ठरला अश्वचालकांची डोकेदुखी

**माथेरान :** पर्यटनाला चालना देण्यासाठी माथेरानमध्ये अनेक विकासकामे जोमात सुरु आहेत. यापैकी महत्त्वाचा मार्ग क्ले-पेव्हर ब्लॉकद्वारे मजबूत करण्यात येत आहे, पण या रस्त्यावरुन पर्यटकांसह घोडे घसरण्याच्या वारंवार घटना घडत असल्याने अश्व चालकांसाठी हा विकास डोकेदुखी ठरत आहे.

एमएमआरडीएच्या वतीने माथेरानचे प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी ते महात्मा गांधी रोड या अडीच किलोमीटर रस्त्याचे क्ले-पेव्हर ब्लॉकद्वारे मजबुतीकरण करण्यात येत आहे. पावसाळ्याच्या अगोदर दस्तुरीपासून एक किलोमीटर अंतरापर्यंत ब्लॉक लावण्याचे काम झाले आहे. या मार्गावर



सखाराम-तुकाराम पॉईंट ते अमन लॉज स्थानकापर्यंत जो उतार असल्याने घोडे घसरण्याच्या घटना घडतात. यामुळे घोडा आणि त्यावरील पर्यटकांनाही दुखापत होते. शनिवार आणि रविवार या मार्गावर अशा पाच घटना घडल्या. यामध्ये एका पर्यटकाच्या हाताला दुखापत झाली आहे.

माथेरानच्या मॉनिटरिंग कमिटीने या रस्त्यावर मातीचे क्ले-पेव्हर ब्लॉक लावण्याचे सांगितले असून कंत्राटदाराने क्ले-पेव्हर ब्लॉक बसविले असले तरी ते फक्त लाल मातीचे आहेत का, तांत्रिक तपशीलानुसार ते योग्य तापमानात भाजले आहेत का, आदींबाबत अनेक जण प्रश्न उपस्थित करत आहेत.

# डॉ. अंजुषा पाटील 'साहित्य सेवा' पुरस्काराने सन्मानित

**ठाणे :** ललितलेखन, निवेदन, कथाकथन इत्यादी अनेक क्षेत्रांमध्ये भरीव कामगिरी करणाऱ्या लेखिका, समिक्षिका, कवयित्री समुपदेशक अंजुषा पाटील यांना अत्यंत मानाच्या 'साहित्य संगम प्रतिष्ठान'तर्फे दिल्या जाणाऱ्या साहित्यसेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. निवृत्त मॅजिस्ट्रेट जी.ए.पाटील यांची फाटक्या कपड्यातील बाप, मुक्काम पोस्ट कचराकुंडी या दोन पुस्तकांचे प्रकाशन शारदा प्रकाशनने ठाण्यात केले. त्याप्रसंगी हा साहित्य सन्मान देण्यात आला.

'लिहिता लिहिता', 'गूज मनीचे' आणि 'ओंजळ' या तीन पुस्तकांचे प्रकाशन करणाऱ्या डॉक्टर अंजुषा पाटील यांना अनेक प्रकारचे पुरस्कार मिळालेले आहेत. "लिहिता लिहिता" या ललित लेखसंग्रह द्वारे साहित्य क्षेत्रात पदार्पण करून सामना, महाराष्ट्र टाइम्स, प्रत्यक्ष दैनिक आणि ठाणे वार्ता अशा वर्तमानपत्रात वेगवेगळ्या विषयावरच्या लेखमाला प्रसिद्धीच्या झोतात आहेत. अंजुषा पाटील ह्या आज अनेक पुस्तकांचे शब्दांकन ,अक्षर जुळणी, आणि अनेक पुस्तकांना प्रस्तावना देण्याचे काम करत आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी 'मानसिक आरोग्य' या विषयांमध्ये पीएचडी संपादन केली आहे त्या अनुषंगाने त्या विद्यार्थी व पालक त्यांचे समुपदेशन करीत आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रातल्या मान्यवरांच्या त्या मुलाखती घेत आहेत. कालिदास प्रतिष्ठान ठाणे शाखेच्या सचिव म्हणून कार्यरत आहेत.



गद्य लेखनामध्ये त्यांचा हातखंडा असून कविता लेखन आहे त्यांचा आवडता छंद आहे. अनेक सामाजिक संस्थांमध्ये त्या सामाजिक कार्य करत आहेत. ठाणे महानगरपालिकेचा "आदर्श शिक्षक पुरस्कार" त्यांना प्राप्त झाला आहे. आदर्श मुख्याध्यापिका म्हणून त्यांनी बरीच वर्ष काम केलेलं आहे. सध्या त्यांचे मुलांचे आरोग्य हे पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहे. साहित्य संगम प्रतिष्ठान तर्फे डॉक्टर अंजुषा पाटील यांना साहित्य गौरव पुरस्कार मिळाल्यामुळे सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. त्याबद्दल त्यांनी जी.ए पाटील निवृत्त मॅजिस्ट्रेट आणि शारदा प्रकाशनाचे प्रा. संतोष राणे यांचे आभार मानले आहेत.

# बेलापूरचा किल्ला मोजतोय अखेरची घटीका

**नवी मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्यात किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व होते. महाराजांचे किल्ल्यांवर जीवापाड प्रेम होते. किल्ल्यांमुळे मराठ्यांच्या मुलुखांचे साम्राज्य टिकून होते. सागरी आरमारांना सुरक्षा देण्याचे कामही किल्ले करायचे. पनवेल, उरणपासून वसईपर्यंतच्या आरमारांवर लक्ष ठेवण्याचे महत्त्वाचे काम बेलापूरच्या किल्ल्यातून होत असे. आज तोच किल्ला दुर्लक्ष होत असल्याने नामशेष होण्याच्या मार्गावर आला आहे. सुवर्णमयी इतिहासातील अनेक चांगले-वाईट दिवस पाहिलेला आणि पेशवेकाळातही नवी मुंबईचे महत्त्व अधोरेखित करणारा हा साक्षीदार आता नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

खऱ्या अर्थाने त्याला आता नवी उजाळी देण्याची गरज निर्माण झाली आहे. इतिहास संशोधकांच्या मते 1570 च्या दशकात भुईकोट प्रकारातील हा किल्ला एका टेकडीवर तयार करण्यात आला. जंजिरा किल्ला तयार करणाऱ्या सिद्दी जोहर याने हा किल्ला बांधल्याच्या नोंदी इतिहासात सापडतात. पोर्तुगीज, मराठे आणि इंग्रजांची अशा विविध साम्राज्यांची सत्ता या किल्ल्याने पाहिली आहे. 1570 च्या काळात पोर्तुगिजांकडून हा प्रदेश जेव्हा सिद्दीने ताब्यात घेतला, तेव्हा पनवेलच्या बंदरावर येणाऱ्या मालवाहू जहाजांवर लक्ष ठेवण्यासाठी नवी मुंबईच्या खाडीकिनारी या टेकडीवर किल्ल्याची टेहाळणीकरता निर्मिती केली. त्यानंतरच्या काळात पोर्तुगिजांनी पुन्हा बेलापूर किल्ला सिद्दीकडून ताब्यात घेतला. त्या काळातील परिसराला शाबाज बोलले जायचे. पुढे याच शब्दावरुन शहाबाज नावाचे गाव तयार झाले.

### किल्ल्याला हवी उजाळी



**आता किल्ल्यावर फार जुने अवशेष फक्त नावापुरतेच उरले आहेत. पनवेल, उरण, नवी मुंबई पसिरातील इतिहास तज्ज्ञ आणि काही किल्लेप्रेमी संवर्धनासाठी जात असतात. पण, नंतर या ठिकाणी आलेल्या सिडको, महापालिका आणि इतर प्राधिकरणांनीही दुर्लक्ष केल्याने किल्ल्यावर अलीकडच्या काळातील अवशेषही नाहीसे होण्याच्या मार्गावर आहेत.**

# शहापूर वैभव

५ | ठाणे, बुधवार, २० ऑक्टोबर २०२१ | संपादक - मिलिन्द बल्लाळ | निवासी संपादक - राजेश जागरे | www.thanevaibhav.in


**आम्हा घरी धन | शब्दांचीच रत्ने |**
**शब्दांचीच शस्त्रे | यत्ने करु ||**

## संरक्षणक्षेत्रातील आत्मनिर्भरतेकडे...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विजयादशमीनिमित्त देशातल्या सात नवीन संरक्षण उपकरण तयार करणार्या कंपन्या राष्ट्राला अर्पण केल्या. ऑर्डिनेन्स फॅक्टरी बोर्ड बरखास्त करून या कंपन्यांची स्थापना करण्यात आली होती. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे आता शस्त्र आयातीची गरज भासणार नाही, अशी अपेक्षा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले की, गेल्या पाच वर्षात ३२५ टक्क्यांनी शस्त्र निर्यातीत वाढ झाली आहे. संरक्षण कंपन्यांना अपग्रेड करण्याची गरज होती आणि ती पूर्ण करण्यात आली आहे. नव्या सात कंपन्यांमुळे संरक्षण क्षेत्राचे बळ आणखी वाढेल. यात म्यूनिशंस इंडिया लिमिटेड, आर्म्ड व्हेईकल महामंडळ लिमिटेड, ॲडव्हान्स्ड वेपन्स अँड इक्विपमेंट इंडिया लिमिटेड, ट्रुप्स कम्फटर्स लिमिटेड, यंत्र इंडिया लिमिटेड, इंडिया ऑप्टेल लिमिटेड, ग्लिडर्स इंडिया लिमिटेड या कंपन्यांचा उल्लेख करता येईल. या कंपन्या पिस्तुलपासून ते लढाऊ विमानांपर्यंतची निर्मिती आणि बांधणी करणार आहेत. अर्थात संरक्षण उपकरणे तयार करणार्या सात कंपन्यांचा नवीन गट स्थापन करण्याचा निर्णय हा पंधरा वीस वर्षांपासून अडकला होता. या कंपन्या आगामी काळातही भारताचे लष्करी सामर्थ्य वाढवण्यासाठी मोठा हातभार लावतील. जागतिक युद्धाच्या काळात भारताच्या ऑर्डिनन्स फॅक्टरीची शक्ती जगाने अनुभवली आहे. तत्कालिन काळात आपल्याकडे सर्वोत्तम स्रोत होते. जागतिक दर्जाचे कौशल्य होते. स्वातंत्र्यानंतर आपण फॅक्टरी अपग्रेड करणे आणि नवीन तंत्रज्ञानाचा अंगीकार करणे गरजेचे होते. परंतु त्याकडे दुर्लक्ष केले गेले. पण आता केंद्राने देशाच्या संरक्षण सिद्धतेत वाढ करण्यासाठी शस्त्र निर्मिती क्षेत्राकडे अधिक लक्ष देण्याचे ठरवले आहे.

काही काळापूर्वी संरक्षण मंत्रालयाने शंभराहून अधिक सामरिक उपकरणांची यादी जाहीर केली आणि यापुढे या उपकरणाची आयात केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. या कंपन्यांकडे आतापासूनच ६५ हजार कोटी रूपयांचे ऑर्डर आहेत. ही ऑर्डर म्हणजे संरक्षण क्षेत्रातील कंपन्यांवरचा असलेला विश्वास होय. संरक्षण तज्ञ कमर आगा म्हणतात की, एक काळ असा होता, की संरक्षण क्षेत्रात भारत संपूर्ण जगावर अवलंबून असायचा. परंतु आज चित्र बदलले आहे. भारत आज शस्त्रनिर्मिती करत असून त्याची निर्यात देखील करत आहे. नव्या धोरणानुसार एक कंपनी ॲम्यूनेशन आणि एक्सप्लोसिव्हची गरज पूर्ण करेल, तर दुसरी कंपनी आर्मी व्हेईकल मॅन्यूफॅक्चर करेल. याप्रमाणे ॲडव्हान्स वेपन, इक्विपमेंट असो, ट्रुप्स कम्फर्ट असो, ऑप्टिकल इलेक्ट्रॉनिक्स असो किंवा पॅराशूट असो या साधनांची निर्मिती देशातच केली जाणार आहे. कंपन्यांनी केवळ एक्सपरटाईज साध्य करून थांबणे उपयोगाचे नसून ग्लोबल ब्रँड म्हणूनही प्रस्थापित व्हावे, अशी केंद्र सरकारला अपेक्षा आहे. कॉम्पिटिटिव्ह कॉस्ट हे आपले बलस्थान आहे. दर्जा आणि विश्वासर्हता ही ओळख होणे आवश्यक आहे. डिफेन्स आणि एरोस्पेस सेक्टरमध्ये संशोधनाला चालना देण्यासाठी आणि ३०० हून अधिक स्टार्टअपला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने पुढील पाच वर्षांत सुमारे ५०० कोटी रुपयांचे बजेट प्रस्तावित केले आहे. देशभरातील तज्ज्ञ आणि संशोधकांच्या कौशल्यांचा उत्पादनाला लाभ मिळण्यासाठी 'आयडेक्स' हे येत्या पाच वर्षांत पाचपट अधिक प्रमाणात स्टार्टअपला पाठबळ देणार आहे. शेवटी केंद्र सरकारचा उद्देश हा आधुनिक, सक्षम आणि सुसज्ज लष्कराबरोबरच मजबूत, सामर्थ्यशाली आणि संपूर्णपणे आत्मनिर्भर संरक्षण उद्योग उभारण्याचा आहे.

## एक्सप्रेसमध्ये दरोडा, महिलेवर अत्याचार, जीवघेणे हल्ले वाढले

### लांब पल्ल्याचा प्रवास झाला धोकादायक



**रेल्वेची सुरक्षा व्यवस्था तकलादू**

**कल्याण-कसारा दरम्यान लोकल प्रवास असो वा मेल एक्सप्रेस प्रवास, हा प्रवाशांच्या जीवाला घोर लावण्यास भाग पाडत आहे. धावत्या गाड्यांमध्ये काही गुन्हेगारी क्षेत्रातील तरुणाई जवळ शस्र बाळगून खुलेआम रेल्वेतून प्रवास करत आहे. अशा गुंड प्रवृत्तीच्या तरुणांमुळे प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. काही फेरीवाले आरक्षण बोगीतील प्रवाशांच्या मौल्यवान वस्तूंवर मग ते सोन असो किंवा मोबाइल संधी मिळताच डल्ला मारुन पोबारा करत आहे. अशावेळी एखाद्या प्रवाशाने प्रतिकार केल्यास त्या चोरट्यांकडून प्रवाशावर शहस्राने प्राणघातक हल्ला केला जातो. तरीही सुरक्षा व्यवस्था तकलादूच असून रेल्वेतील गुन्हेगारी रोखण्यासह लाखो प्रवाशांच्या सुरक्षेसाठी कल्याण लोहमार्ग पोलिस ठाण्यामध्ये आवश्यक मनुष्यबळही नाही. या पोलीस ठाण्याचे कल्याण ते वांगणी आणि कल्याण ते कसारा असे कार्यक्षेत्र पाहता मनुष्यबळाची कमतरता भासत आहे.**

शहापूर: शहरी-ग्रामीण भागातील लोकवस्तीतील वाढत्या गुन्हेगारीने आता मध्य रेल्वेला लक्ष केले आहे. दरोडा, महिलांवरील अत्याचार, जीवघेणे हल्ले, मोबाइल चोरी आणि चेनस्नॅचिंग यांसारख्या घटनांनी धावत्या रेल्वेत गुन्हेगारीचा आलेख वाढत आहे. यात तरुणांचा सहभाग वाढत असल्याचे मध्य रेल्वेच्या कल्याण-कसारा मार्गावरील पुष्पक एक्सप्रेस आणि पनवेल गोरखपूर एक्सप्रेसमध्ये घडलेल्या घटनेवर नजर टाकली तर लक्षात येईल.

मध्य रेल्वेच्या कल्याण-कसारा मार्गावर धावत्या गाडीत मोबाइल, पर्स, बॅग चोरी, जीवघेणे हल्ले आणि दरोडे टाकणे हे गुन्हे काही नवीन राहिले नाहीत. 8 ऑक्टोबर 2021 रोजी लखनऊ-मुंबई पुष्पक एक्सप्रेसमध्ये इगतपुरी ते कसारा स्थानक दरम्यान आठ जणांच्या टोळक्याने गाडीच्या एका बोगीमध्ये दरोडा टाकून 16 प्रवाशांकडील मोबाइल आणि रोख रक्कम लुटली होती. एवढ्यावरच न थांबता या नराधमांनी शस्राचा धाक दाखवून एका विवाहित 20 वर्षीय तरुणीचे लैंगिक शोषण करुन क्रूरकर्म केले होते. ही घटना सरुन सात दिवस उलटत नाहीत तोवर आठव्या दिवशी म्हणजे 15 ऑक्टोबर 2021 रोजी धावत्या पनवेल-गोरखपूर एक्सप्रेसमध्ये त्रिकुटामध्ये झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर प्राणघातक हल्ल्यात झाल्याची घटना समोर आली. आश्चर्य म्हणजे हे क्रूर कर्म करणारी टोळकी पस्तीशीच्या आतील असून ते चरशी, मद्यपान आणि वेगवेळ्या नशा करून धावत्या रेल्वेत गुन्ह्यांचा रेट वाढवत आहे. या दोन्ही गुन्ह्यांमधील गुन्हेगार सराईतांपेक्षा क्रूर असल्याचे दिसून येते.

**रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**

पुष्पक एक्सप्रेस आणि पनवेल गोरखपूर एक्सप्रेसमधील घटनांनी प्रवाशांनाही हादरे बसले आहेत, त्यामुळे पुन्हा एकदा प्रवाशांच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यापूर्वी देखील असे अनेक गुन्हे घडले असून त्यात काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे फेरीवाले अटक देखील झाली आहे. परवाचा धावत्या एक्सप्रेसमधील जीवघेणा हल्ला हा देखील फेरीवाल्यांमध्ये पूर्व वैमनस्यातून झाल्याचे कल्याण लोहमार्ग पोलीस तपासातून उघड झाले आहे. गुन्हेगार स्वरुपाची वृत्ती धावत्या रेल्वेत फेरीवाल्याची भूमिका घेऊन रेल्वेतील सुरक्षा रक्षक आणि स्थानकात रेकी करुन दरोडा आणि प्रवाशांना लुटण्याचे पूर्व नियोजन करत आहे, परंतु अशा कृत्यांमुळे दगा फटका बसून एखाद्या निष्पाप प्रवाशाचे जीव धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही महिन्यांपूर्वी हातातील मोबाइल खेचणाऱ्या चोरट्याबरोबर झालेल्या झटापटीमध्ये डोंबिवली येथील विद्या पाटील यांचा धावत्या लोकल ट्रेनमधून पडून दुर्दैवी मृत्यू झाला होता. यापूर्वीही प्रकार घडल्याने अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. कधी काय कृत्य घडेल याचा नेम आता रेल्वे प्रवासातही न राहिल्याने प्रवाशांचा विशेष महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे.

## अखेर फोफोडी स्मशानभूमीचे झाले भूमीपूजन



**शहापूर: ग्रुप ग्रामपंचायत कानवे अंतर्गत फोफोडी येथे जनसुविधा योजनेतंर्गत स्मशानभूमीचे काम मंजूर होते. सदर कामाचे भूमीपूजन किन्हवली जिल्हा परिषद गटाच्या सदस्या कांचन साबळे यांच्या हस्ते करण्यात आले.**

स्वातंत्र्यापूर्वीपासून आजपर्यंत फोफोडी गावाला स्मशानभूमी नसल्याने पावसाळ्यात मृतदेहांची प्रचंड हेळसांड होत होती. ही अडचण लक्षात घेऊन कांचन साबळे व उपसरपंच स्वप्नील भेरे यांनी दोन वर्षे सातत्याने पाठपुरावा करून सदर काम मंजूर करून घेतले. या कामासाठी शिवसेना (ग्रा) जिल्हाप्रमुख प्रकाश पाटील, जि.प.अध्यक्ष पुष्पा पाटिल, तत्कालीन जिल्हा परिषद अध्यक्षा सुषमा लोणे, उपाध्यक्ष सुभाष पवार, माजी आमदार पांडुरंग बरोरा, अविनाश साबळे यांनी प्रयत्न केले. या भूमिपूजन सोहळ्यासाठी पंचायत समिती सदस्या पुष्पा बांगर, कानवे ग्रामपंचायत सरपंच अलका पवार, उपतालुका प्रमुख विकास गगे, बाळकृष्ण विशे, निखिलेश धानके, अविनाश साबळे, मधुकर वेखंडे, संजय बांगर, काळूराम बांगर, किशोर भेरे, पुंडलिक रिकामे, उल्हास फर्डे, नामदेव गगे व फोफोडी गावातील ग्रामस्थ व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डोळखांब प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांच्या जीवाशी खेळ

### कुणबी राजा संघटनेच्या आक्रमक पावित्र्यानंतर आरोग्य विभाग ताळ्यावर



**शहापूर: नुकतेच एका अपघाताच्या घटनेदरम्यान डोळखांब प्राथमिक आरोग्य केंद्राचा रुग्णांच्या जीवाशी खेळ खेळणारा कारभार उघड झाला आहे. कागदोपत्री पाच गाड्या उपलब्ध असणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रातून एकही गाडी उपलब्ध नसल्याने 20 जखमी रुग्ण एका मालवाहू गाडीत पुढील उपचारासाठी न्यावे लागल्याची घटना घडली.**

कुणबी राजा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याने जिल्हा आरोग्य अधिकारी रेंगे यांना या घटनेची दाखल घ्यावी लागली. आरोग्य विभागाच्या या जीवघेण्या कारभाराविरोधात डोळखांबमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष पसरला आहे.

अपघातात जखमी झालेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी हलवण्यासाठी डोळखांब प्राथमिक आरोग्य केंद्रात वाहन उपलब्ध न झाल्याने कुणबी राजा संघटनेचे अध्यक्ष शिवाजी भेरे यांच्या नेतृत्वाखाली आक्रमक पवित्रा घेऊन आरोग्य अधिकाऱ्यांच्या गलथान कारभाराची पोलखोल केली. कंत्राटी तत्वावर असलेल्य गाड्या फक्त कागदोपत्री असल्याचा आरोप यावेळी संघटनेने केला आहे. याबाबत आरोग्य कर्मचारी उर्मट उत्तरे देत असल्याने कुणबी राजा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांशी संपर्क केला. आक्रमक झालेल्या कार्यकर्त्यांचा रोष पाहून जिल्हा आरोग्य अधिकारी मनिष रेंगे यांनी तत्काळ निर्णय घेत या प्राथमिक आरोग्य केंद्रात भाडे तत्वावर असलेल्या तीनही गाड्या तत्काळ कार्यमुक्त करण्याचे आदेश वैद्यकीय अधिकारी डॉ.पाटिल यांना दिले. नवीन दोन शासकीय गाड्या लवकरच उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही देण्यात आले. कोणत्याही प्रकारचा शासकीय आदेश नसतांना आजपर्यंत वर्षभर टाकीपठार आरोग्य केंद्रात उभी असलेली 108 ची रुग्णवाहिका तत्काळ पुन्हा डोळखांब प्राथमिक आरोग्य केद्रासाठी पूर्ववत करण्यात आली.

## आझादी का अमृतमहोत्सव 'फ्रीडम रन' उत्साहात



शहापूर: तालुक्यातील पाली येथे भारत सरकार युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, नेहरू युवा केंद्र ठाणे आणि स्वामी विवेकानंद संस्था पाली व श्रीसाईश्रद्धा सेवाभावी ट्रस्ट, सरवली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आझादी का अमृतमहोत्सव' उपक्रमांतर्गत 'फ्रीडम रन' हा राष्ट्रीय कार्यक्रम पार पडला.

विश्वगुरु सन्मानित राष्ट्रीय धर्माचार्य ह.भ.प. नामदेव महाराज हरड यांच्या अध्यक्षतेखाली आणि नेहरु युवा केंद्राचे ठाणे जिल्हा युवा अधिकारी निशांत रौतेला, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.मनीष रेंघे, समाज कल्याण न्यासचे संस्थापक अध्यक्ष सोन्या पाटील, सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. गोविंद महाराज तरणे, प्रसिद्ध उद्योजक अनिल मानिवडे, सरस्वती विद्यालयाचे माजी प्राचार्य भगवान जाधव,मानवसेवा विकास फाऊंडेशनचे प्रदेश संघटक व्ही.एस.पाटील, सिने-नाट्य अभिनेते सचिन पाटील, ठुणे केंद्रप्रमुख डॉ.विलास वेखंडे, स्वामी विवेकानंद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुनील म्हसकर, सचिव संजय तरणे, श्रीसाईश्रद्धा ट्रस्टचे संस्थापक विष्णू भोईर व मार्गदर्शक डॉ.अमोल बहिनावल, राजेश पाटील, गणपत चौधरी, उत्कर्ष महाविद्यालयाचे माजी चेअरमन अरुण भालेकर, प्रकाश फर्डे यांच्या विशेष उपस्थितीत झाला.

या राष्ट्रीय कार्यक्रम प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते 75 आदिवासी महिलांना कपडे वाटप व आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप तसेच उपस्थित सर्वांना मास्क व खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमात सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. गोविंद महाराज तरणे यांना त्यांच्या अध्यात्मिक सेवेबाबत स्वामी विवेकानंद संस्थेतर्फे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले तर सुनील म्हसकर यांनी, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, आरोग्य, पर्यावरण आदी क्षेत्रातील कार्यामुळे गावाचा नावलौकिक आंतरराष्ट्रीय पातळीवर केल्याबाबत मौजे पाली ग्रामस्थांनी सुनील म्हसकर यांस जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले.

यावेळी ठुणे केंद्रप्रमुख डॉ.विलास वेखंडे यांच्या शिक्षण क्षेत्रातील उत्तम योगदानाबद्दल तसेच मुंबई विद्यापीठाच्या वतीने शिक्षणशास्त्र विषयात डॉक्टरेट पदवी प्राप्त झाल्याने 'राज्यस्तरीय शिक्षण रत्न पुरस्कार', सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. डॉ.कैलास महाराज निचिते यांना त्यांच्या आध्यात्मिक सेवेबाबत आणि त्यांस अमेरिकेतील साऊथ वेस्टर्न युनिव्हर्सिटी तर्फे आध्यात्मिक विज्ञानातील मानद डॉक्टरेट पदवी प्राप्त झाल्याने 'राज्यस्तरीय आध्यात्म रत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे सापगाव येथील भातसा नदीला पूर आलेल्या भयंकर स्थितीत अपघातग्रस्त बुडत्या कारमधील लोकांचे जीव वाचवण्यासाठी वेळीच आपल्या प्राणांची पर्वा न करता देवदूत बनून धावून जाणारे धाडसी व्यक्तिमत्त्व रमेश अंदाडे, पंकज अंदाडे, दर्शन घरत तसेच ठाणे येथील श्रीरंग विद्यालयाचे उपक्रमशील शिक्षक नितीन चव्हाण, अरुण भालेकर व शाम शेलार, वारकरी तत्वज्ञान विद्यापीठाचे सहशिक्षक शिवाजी सातपुते, मुख्याध्यापिका कमल जाधव, दीपाली शिरसाट, अंगणवाडी सेविका शोभा तरणे, हिराबाई तरणे, आशा सेविका शैला तरणे, ह.भ.प. जयराम तरणे, बचतगट समन्वयक ललिता रंदवी, आदिवासी मुला-मुलींना नेतृत्व व नृत्याचे धडे देणारी लक्ष्मी वाघे यांचा त्यांनी कोरोनाच्या कठीण परिस्थितीत केलेल्या उल्लेखनीय योगदानाबाबत स्वामी विवेकानंद संस्थेच्या वतीने सन्मानचिन्हं देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

## अपघात-बेवारस वाहनांबाबत तहसिल विभागाची लिलावास परवानगी


शहापूर: अपघातातील व बेवारस परिस्थितीत पडून असलेली वाहनांच्या लिलावासाठी शहापूर तहसीलदार यांची परवानगी मागण्यात आली होती. परवानगी मिळाली असल्याने लिलावापूर्वी येत्या आठ दिवसांत मालकांनी आपली वाहने घेऊन जावीत असे निर्देश वासिंद पोलीस निरीक्षक यांनी पत्रकाद्वारे दिले आहेत.

वासिंद पोलीस ठाणे आवारात अपघातातील व इतर बेवारस अशी दुचाकी, तीन चाकी वाहने बऱ्याच कालावधीपासून पडून आहेत. पोलीस ठाण्याचे मुद्देमाल अभिलेख तपासून पहाता कोणत्याही प्रकारच्या नोंदी मिळून येत नाहीत. ही वाहने नादुरुस्त अवस्थेत आहेत. त्यामुळे सदर वाहनांच्या मालकांनी वाहनांची कागदपत्रे दाखवून सात दिवसांचे आत वाहने घेऊन जावीत, अन्यथा सरकारी नियमानुसार योग्य कारवाई करण्यात येईल, असे यापूर्वी स्पष्ट करून या लिलावाबाबत तहसील कार्यालयाकडे परवानगी मागण्यात आली होती.

लिलाव प्रक्रियेला शहापूर तहसीलदार यांची परवानगी मिळाली असल्याने येत्या आठ दिवसांत सबंधित मालकांनी कागदपत्रे दाखवून घेऊन जावीत, असे आदेश वासिंद पोलीस ठाण्यातून निर्गमित करण्यात आले आहेत.

## ग्रामीण भागातील विद्यार्थीनींची नवोदय विद्यालयात निवड







शहापूर: जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेत शहापूर तालुक्यातील ठुणे केंद्रांतर्गत जिल्हा परिषद शाळा आदिवली या शाळेची विद्यार्थिनी वैष्णवी निमसे व जिल्हा परिषद शाळा नारायणगाव या शाळेच्या विद्यार्थीनी कार्तिकी उघडा तसेच मानसी शिर्के या दोन विद्यार्थीनींची निवड झाली आहे.

विशेष म्हणजे मागील तीन वर्ष सातत्याने आदिवली शाळेच्या तीन विद्यार्थीनींची नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत निवड होऊन आज त्या तिन्ही विद्यार्थीनी तेथे शिक्षण घेत आहेत.. या यशासाठी नारायणगाव शाळेतील शिक्षक योगेश रोठे,आदिवली शाळेतील शिक्षक भगवान वरकुटे, बाळू निमसे यांनी मार्गदर्शन केले आहे.

दुर्गम भागातील केंद्र असूनही शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी ठुणे केंद्र अग्रेसर ठरले. यासाठी विस्तार अधिकारी हिराजी वेखंडे, केंद्रप्रमुख विलास वेखंडे यांचे नियोजन लाभले.

## खराडे ग्रामपंचायतीत शासनाच्या निधीचा अपव्यय ?

### तक्रारदाराला माहिती देण्यास टाळाटाळ

**शहापूर: तालुक्यातील खराडे ग्रामपंचायतीच्या सरपंच व तीन ग्रामसेवकांनी ग्रामनिधीत लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला असून या गैरकारभाराची चौकशी करावी अशी मागणी सचिन विशे यांनी शहापूर गटविकास अधिकारी यांच्याकडे सव्वा वर्षांपूर्वी केली होती. मात्र आजतागायत न्याय मिळत नसल्याने आंदोलन करणार असल्याची माहिती तक्रारदाराने प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलतांना दिली.**

खराडे ग्रामपंचायतमधील ग्रामसेवक, सरपंच व उपसरपंच यांनी मिलीभगत करुन मागील कार्यकाळात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केला असून कागदोपत्री बनावट कामे दाखवून ड्रीम इंटरप्रायजेस या दुकानाच्या नावाने बिले काढली असल्याचा आरोप विशे यांनी तक्रारीत केला आहे. या ग्रामपंचायतमधील भ्रष्टाचार 2012 ते 2017 दरम्यान झाला असून सदर भ्रष्टाचार सरपंच शांता वाघ, गुलाब वाघ तसेच ग्रामसेवक खारीक व बांगर यांच्या कार्यकाळात झाला असल्याचे तक्रारदारांनी स्पष्ट केले आहे. 2015-16 मध्ये जनसुविधा योजनेमधून चांदगाव येथे स्मशानभूमीचा घाट बांधणेकामी अंदाजपत्रकानुसार एक लाख 23 हजार 886 इतकी रक्कम मंजूर असून या कामावर एक लाख 23 हजार आठशे इतकी रक्कम खर्च झालेली दाखवली असून कामाची मोजमाप पुस्तिका व मूल्यांकन दाखलाच उपलब्ध नसल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. विशेष म्हणजे 2011 पासून ते 2014 पर्यंत ग्रामनिधीची रोजकिर्दच गायब असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

**गटविकास अधिका-यांनी त्यांना अंतिम नोटीस देऊनही त्यांनी लेखी खुलासा दिला नसल्याचे समजते. आम्ही पाठपुरावा करुनही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवण्यास टाळाटाळ केली जाते, असा आरोप सचिन विशे यांनी केला आहे.**




तथापी तक्रारदार सचिन विशे यांनी 25 जुलै 2020 रोजी पहिली तक्रार दाखल केली होती. मात्र आजतागायत त्यांना न्याय मिळाला नसल्याने पंचायत समितीच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात आहे.

## ...अन्यथा खर्डी एमआयडीसी प्रकल्प माघारी घ्या-भरत उबाळे

**कसारा: राज्य शासन शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अन्यायाची भूमिका घेत आहे. तालुक्यातील खर्डी येथील एमआयडीसीचा प्रकल्प एक तर राज्य शासनाने माघारी घ्यावा अन्यथा देय असलेला मोबदला द्यावा, अशी रोखठोक भूमिका विधायक क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भरत उबाळे यांनी मांडली आहे.**

शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नावर येथील राजकीय पुढारी मौन का बाळगून आहेत, असा प्रश्न भरत उबाळे यांनी उपस्थित केला आहे. या प्रश्नात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हेच मार्ग काढू शकणार असल्याने त्यांची शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासोबत भेट घेणार असल्याचे उबाळे यांनी सांगितले.

2018 मध्ये महाराष्ट्र ओद्योगिक विकास महामंडळाने तालुक्यातील खर्डी विभागातील पाच गावांमध्ये 750 एकर क्षेत्र भूसंपादीत केले आहे. त्यावेळी 500 कोटींचा मोबदला वाटप केला होता. तो बाधीत शेतकऱ्यांपैकी काहींना त्यावेळी देण्यात जाणीवपूर्वक घाई करण्यात आली. मात्र त्यानंतर गेल्या तीन वर्षांपासून उर्वरित स्थानिक शेतकऱ्यांना सूमारे 400 कोटी रुपये देणे असलेला मोबदला अद्याप देण्यात आलेला नाही. मोबदला रखडलेला खर्डीतील एमआयडीसीचा हा प्रकल्प राज्य शासनाने एक तर माघारी बोलवावा अन्यथा शेतकऱ्यांना देय असलेला मोबदला द्यावा, अशी मागणी भरत उबाळे यांनी केली आहे.

# ठाणे पालिकेतील 'त्या' कर्मचाऱ्यांचा लढा सुरुच

## अवैध प्रमाणपत्र सादर केले नसल्याचा कर्मचाऱ्यांचा खुलासा

**ठाणे: नोकरीसाठी कोणत्याही प्रकारचे अवैध जातप्रमाणपत्र सादर करण्यात आले नसून चुकीच्या कारभारामुळे कर्मचाऱ्यांना फटका बसत असल्याचा दावा ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्युमन महाराष्ट्र या संस्थेने केला आहे. या कर्मचाऱ्यांचे आझाद मैदान येथे साखळी उपोषण सुरु असून उपोषणाचा आजचा 18वा दिवस आहे.**

ठाणे महापालिकेच्या सेवेत अवैध जात प्रमाणपत्र सादर केलेल्या 49 जणांची यादी प्रशासनाने तयार केली असून तशाप्रकारचा अहवाल ठाणे पालिकेने राज्य शासनाकडे पाठविला आहे. मात्र या संपूर्ण प्रकरणात कर्मचाऱ्यांनी देखील ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्युमन महाराष्ट्र या संस्थेच्या माध्यमातून आपली न्याय बाजू मांडली आहे. कर्मचाऱ्यांवर चुकीच्या पध्दतीने कारवाई झाली असल्याचे या सर्व कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. आम्ही कोणत्याही प्रकारे अवैध जात प्रमाणपत्र सादर केले नसल्याचे संस्थेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. परंतु अशा प्रकारे जात प्रमाणपत्र अवैध ठरवून कर्मचाऱ्यांना पेन्शन व कुटुंब निवृत्ती वेतनापासून वंचित राहण्याची वेळ त्यामुळे आली आहे. त्यामुळे या विरोधात 2 ऑक्टोबर पासून आझाद मैदानावर उपोषण देखील सुरु केले असून न्याय मिळावा अशी अपेक्षा संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या 31 जुलै 1981 च्या शासन आदेशानुसार एमआरसी 81 कोडनुसार सर्व आदिवासी जमातींना महसुल विभागाने अस्सल जात प्रमाणपत्र दिले होते. परंतु प्रमाणपत्रातील खरे खोटेपणा न तपासता मानववंश शास्त्रचे कोणतेही ज्ञान नसतांना जात तपासण्याचा बनाव आदिवासी विकास विभाग, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था व राज्यातील अनुसुचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समित्या करीत असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. या 47 अनुसुचित जमाती पैकी 33 जमातींवर वर्षानुवर्षे आकस, सुडबुध्दी ठेवून अन्याय करत आहेत. राज्यातील ठराविक जमातींन जात प्रमाणपत्र, वैधता प्रमाणपत्र मिळूच नये असे तथाकथित खरे आदीवासी समजणाऱ्या संघटनांना हाताशी धरुन षडयंत्र रचले जात असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे या विरोधात आता लढा उभारण्यात आला असून न्याय मिळावा अशी इच्छा असल्याचेही संस्थेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.



# कोरोनामुळे नाही तर धुळीपासून संरक्षणासाठी लोक मास्क वापरतात

## मनसे आमदार राजू पाटील यांची कडोंमपा प्रशासनावर टीका

कल्याण : कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रात प्रचंड खड्डे निर्माण झाले आहेत. त्यामुळे आता पाऊस कमी झाल्याने रस्त्यावर धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे कल्याण-डोंबिवलीमधील जनता आता कोरोनामुळे नाही तर धुळीमुळे मास्क वापरत असल्याची टीका मनसेचे आमदार राजू पाटील यांनी केली आहे.

कल्याण ग्रामीण भागातील काटई गावातील रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाचा शुभारंभ राजू पाटील यांच्याहस्ते करण्यात आला यावेळी ते बोलत होते. यावेळी कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीसदस्य गजानन पाटील, नगरसेवक प्रभाकर जाधव, काटईचे माजी उपसरपंच काशिनाथ पाटील, मनसे जिल्हा संघटक हर्षद पाटील, रोहित भोईर, फुलचंद पाटील, विश्वास पाटील, योगेश दराडे, जगदीश पाटील आदी पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



कल्याण-डोंबिवलीमधील रस्त्याची चाळण झाली आहे. रस्त्यावरील खड्डयांमुळे आणि धुळीमुळे आता अपघात देखील घडू लागले आहेत. मात्र असं असतानाही प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे कल्याण डोंबिवली मध्ये प्रचंड धुळीचे आणि खड्डयांचे साम्राज्य तयार झाले आहे. त्यामुळे मनसेचे कल्याण ग्रामीण मतदार संघाचे आमदार राजू पाटील यांनी कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांना लक्ष्य केले आहे. 27 गावांसह डोंबिवली शहराकडे यांचे लक्ष नाही. फक्त कल्याणचे आयुक्त म्हणून बसतात तिथे. त्यांच्या दिल्लीवाऱ्या सुरु आहेत. इथे काय परिस्थिती आहे याकडे अजिबात लक्ष नाही. आतापर्यंत खड्डे भरुन व्हायला हवे होते. परवा डोंबिवली एमआयडीसीत सेना-राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांच्या वादानंतर तिथले खड्डे भरले. मात्र आता परत धूळ निघाली आहे. अत्यंत वाईट परिस्थिती आहे. लोकांनी कोरोनापासून बचावासाठी नाही तर धुळीपासून बचावासाठी मास्क वापरणे सुरु केले असल्याची टीका मनसेचे आमदार राजू पाटील यांनी केली आहे.

मंगळवारी कल्याण ग्रामीण विधानसभा मतरदार संघातील काटई गावात आमदार राजू पाटील यांच्या आमदार निधी मधून रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते.

# घरकाम करणाऱ्या महिलांसाठी अनोख्या फॅशन शोचे आयोजन



**ठाणे : एक उडान सामाजिक प्रतिष्ठान आणि श्री इव्हेंट अँड एजन्सी यांच्या संयुक्त विद्यमाने घरकाम करणाऱ्या महिलांसाठी एका अनोख्या फॅशन शोचे आयोजन 17 ऑक्टोबर रोजी करण्यात आले होते.**

कार्यक्रमाला प्रचंड प्रमाणात घरकाम करणाऱ्या महिलांचा प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमात घरकाम करणाऱ्या महिलांची प्रतिभा पाहून सगळेजण आश्चर्यचकीत झाले. एक उडाण सामाजिक प्रतिष्ठानच्या संस्थापिका जयश्री सोळंकी आणि अध्यक्ष राजेश सोळंकी यांच्यातर्फे सर्व स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. आणि पुढील वाटचालीकरता शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमात मुलींच्या गटात सोनल भोये-महाराष्ट्राची स्वप्न मुलगी, विशाखा भोये-दुसरी उपविजेती, पूर्वा चव्हाण-तिसरी उपविजेती, नेहा डिसिल्वा-ब्युटी विथ ब्रेन, सरिता राठोड-सर्वोत्तम वैयक्तिकता, रिया वर्मा-सर्वोत्तम पोशाख, संजना महले-पहिला धावपटू यूपी, जागृती जाधव-सर्वोत्कृष्ट वृत्ती, रोशनी भोयर-विजेता, साक्षी बर्ग-बेस्ट स्माईल, लक्ष्मी भालेराव-सर्वोत्तम डोळे, पायल पानपाटील-सर्वोत्कृष्ट आकृती आणि सोनल द्विवेदी-बेस्ट वॉक या मुली विजयी झाल्या.

लहान मुलांच्या गटात, यशिता साळवे-विजेता, लव पवार-पहिला उपविजेता, श्रेया गायकवाड-दुसरी उपविजेती, श्राव्य वघडे-तिसरा उपविजेता, जुई पाटील-बेस्ट स्माईल, लक्ष्मी कडाळे-सर्वोत्कृष्ट वृत्ती, कावेरी ठाकरे-सर्वोत्तम डोळे, श्रेया सोनकर-सर्वोत्तम छायाचित्रे, निष्ठा सोनकर-सर्वोत्तम वैयक्तिकता म्हणून विजयी ठरले.

विवाहित महिला वर्ग गटात अर्चना शेंडे-महाराष्ट्राची स्वप्न मुलगी, राधिका कांबळे-विजेता, ज्योती चव्हाण-पहिल्या उपविजेत्या, अंकिता गवळी-दुसऱ्या उपविजेत्या, रंजना जाधव-तिसऱ्या उपविजेत्या, कोमल वाघमारे-हुशारीसह सौंदर्य, रुपाली पाटिल-बेस्ट स्माईल, शालिनी बालशी-ब्युटी विथ ब्रेन, शांती शर्मा-बेस्ट वॉक, मेघा पाटील-सर्वोत्तम वैयक्तिकता या महिलांनी विजेतेपद पटकावले.

# देशातील पहिली अत्याधुनिक काचबिंदु शस्त्रक्रिया ठाण्यात

**ठाणे:** काचबिंदू म्हणजे डोळ्यातील दाब वाढल्याने डोळ्याचा नसेला लागणारी इजा हा आजार अधिकपणे अनुवंशिकतेने होणारा असून, योग्य उपचार वेळीस न झाल्यास अंधत्वाकडे नेणारा आहे. या आजाराची काही लक्षणे सुरुवातीस जाणवत नसल्याने, अधिक इजा झाल्यावरच रुग्णाला ह्याचा परिणाम जाणवतो व त्या परिस्थितीत ह्याला नियंत्रणात आणणे अवघड होत जाऊन अनेकांना अंधत्वाला सामोरे जावे लागते. सर्व साधारण जगभरात शंभरात तीन जणांना ह्या रोगाला सामोरे जावे लागते. ठाण्यातील श्रीरामकृष्ण नेत्रालयमध्ये अशा तीन रुग्णांना निवडून त्यांच्यावर केलेली आयस्टेन्टची शस्त्रक्रिया यशस्वी झाली आहे.

काचबिंदू निदान व उपचारात अग्रणी असलेल्या श्रीरामकृष्ण नेत्रालय मध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर गेली अनेक वर्षे होत आहे. याबाबत माहिती देताना नेत्र शल्य चिकित्सक डॉ. नितिन देशपांडे म्हणाले की, ओपन एंगल ग्लूकोमा हा जगात सर्वात अधिक प्रमाणात आढळणारा काचबिंदूचा प्रकार आहे.

# खा. राजन विचारे यांच्या पुढाकाराने मोफत लसीकरण शिबीर



**ठाणे: ठाणे कोरोना मुक्त व्हावे यासाठी खासदार राजन विचारे व नगरसेविका नंदिनी विचारे यांच्या पुढाकाराने सोमवारी ठाण्यातील सिद्धेश्वर तलाव परिसरात मोफत लसीकरण शिबीर आयोजित करण्यात आले होते.**

ठाणे जिल्हा पालकमंत्री एकनाथ शिंदे व ठाण्याचे महापौर नरेश म्हस्के यांच्या सहकार्याने व खासदार राजन विचारे व नगरसेविका नंदिनी विचारे यांच्या पुढाकाराने प्रभाग क्र 12 मधील 18 वर्षावरील नागरिकांसाठी मोफत लसीकरण शिबिराचे आयोजन ठाण्यातील सिद्धेश्वर तलाव परिसरातील गोदुताई परुळेकर मैदानात आयोजित करण्यात आले होते. 18 वर्षांवरील नागरिकांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सोमवार 18 ऑक्टोबर व मंगळवार 19 ऑक्टोबर असे दोन दिवस या लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सोमवारी या शिबिराच्या उदघाटन प्रसंगी महापौर नरेश म्हस्के, नगरसेविका नंदिनी विचारे, माजी नगरसेवक संजय सोनार आदीसह प्रभागातील शिवसेनेचे पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी उपस्थित होते. खासदार राजन विचारे व नगरसेविका नंदिनी विचारे यांच्या प्रयत्नाने प्रभाग क्र 12 मध्ये आता पर्यंत 11 वेळा लसीकरण शिबीर राबवण्यात आले असून जवळजवळ सर्व नागरिकांचे लसीकरण पूर्ण झाले असल्याचे यावेळी नगरसेविका नंदिनी विचारे यांनी सांगितले.

# अखेर दोन वर्षांनी डोंबिवलीतील कॉंग्रेस कार्यालयाचे दार उघडले

## धोकादायक इमारतीत काँग्रेस कार्यालय

**डोंबिवली : डोंबिवली शहातील काँग्रेस पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयाकडे प्रदेश, जिल्हा आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांनी लक्ष दिले नसल्याने अस्वच्छता झाली होती. तब्बल दोन वर्षांनी डोंबिवलीतील हे कार्यालय उघडण्यात आले. कार्यालय उघडल्यावर आतील अस्वच्छता पाहून पक्ष कार्यालयप्रमुखाने कार्यालय स्वच्छ केले असले तरी कार्यालयातील कुबट वास जात नाही. कार्यालयात कसे बसयाचे असा प्रश्न कार्यकर्त्यांना पडला आहे. 40 वर्ष जुन्या इमातीतीत हे कार्यालय आहे.**

लहान खोली, खराब खुर्च्या, बसण्यासाठी जेमतेस चार-पाच जणांना जागा, अडगळीत ठेवलेले सामान व साचलेली घाण आणि कुबट वास असे हे डोंबिवलीतील काँग्रेसचे जनसंपर्क कार्यालय गेली दोन वर्ष बंद होते. सोमवारी 18 ऑक्टोबर रोजी सायंकाळी पक्ष कार्यालय प्रमुखाने हे कार्यालय उघडल्यावर त्यांना कार्यालयाची अवस्था पाहवली नाही. त्यांनी झाडू घेऊन कार्यालय झाडून घेतले. मात्र तरीही कार्यालयात कुबट वास येत होता. डोंबिवलीत प्रदेश सचिव संतोष केणे, जिल्हा अध्यक्ष सचिन पोटे, कार्याध्यक्ष जितेंद्र भोईर, शहर ब्लॉक अध्यक्ष सदाशिव शेलार, नवेंदू पाठारे, गणेश चौधरी, हृदयनाथ भोईर आदी पदाधिकारी कार्यरत आहेत. मात्र तरीही कार्यालयाची अशी अवस्था झाल्याबद्दल कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली आहे. पक्षाच्या बैठका व कार्यक्रम याच कार्यालयात होत असल्याने कार्यालयाकडे लक्ष दिले गेले नाही. काँग्रेस पक्षातील मोठ्या नेत्यांना डोंबिवलीतील कार्यालयाच्या दुरावस्थेबाबत माहिती दिल्यास व नेतेमंडळींनी कार्यालयाला भेट देऊन वस्तुस्थिती पाहण्याची वेळ आली आहे.

डोंबिवलीतील काँग्रेसचे जनसंपर्क कार्यालय धोकादायक इमारतीत आहे. या इमारतीला 40 वर्ष पूर्ण झाली असून इमारतीकडे पालिका प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर काँग्रेसचे छोटे कार्यालय आहेत. या इमारतीत पदाधिकारी आणि कार्यकर्ते बैठका घेण्यापुरतीच येत



असतात. सर्व पदाधिकाऱ्यांना जनसंपर्क कार्यालयाच्या दुरवस्थेबाबत माहिती आहे. मात्र नवीन जनसंपर्क कार्यालय घेण्यासाठी कोणीही पुढाकार घेत नसल्याचे दिसते.

विशेष म्हणजे कार्यालयात पिण्यासाठी पाण्याची सोय नाही. पदाधिकारी आणि कार्यकर्ते पिण्याचे पाणी सोबत घेऊनच कार्यालयात येत असतात. त्यामुळे डोंबिवलीतील हे कार्यालय पदाधिकाऱ्यांच्या नजरेत नसल्यासारखेच असल्याचे दिसते.

या कार्यालयाबाबत सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार वीज मीटर लावले नसल्याने वीज पुरवठा कुठून होतो असे अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत. यासाठी काँग्रेस नेतेमंडळीशी संपर्क साधला असता त्यावर कोणीही भाष्य करण्यास तयार नाही.

# कल्याण ग्रामीणमधील ठाकूरपाडा परिसरात बिबट्याच्या संचाराने खळबळ



**कल्याण : कल्याण ग्रामीण भागातील ठाकुर पाडा, रायते परिसरात बिबट्या आढळल्याने रहिवाशांमध्ये "बिबट्या आला रे" या भितीने खळबळ उडाली आहे.**

कल्याण ग्रामीण परिसरात रायते परिसरातील ठाकुर पाडा येथे आदिवासी महिलेला व त्यांच्या मुलीला बिबट्या दिसल्याच्या चर्चा रगंल्या असून बदलापुरजवळील जांभुळ, मोहेली, वसद भागातील जगंल परिसरात बिबट्याचे ठसे आढळल्याचे दोन दिवसापूर्वी वृत्त होते. वन विभागाच्या कॅमेरात देखील या ठिकाणी बिबट्या कैद झाला होता. बदलापूर ते बारावी धरण परिसरात जंगलाचा भाग मोडतो. यामुळे कदाचित बिबट्या हा ठाकूरपाडा परिसरात दिसला असावा. सद्यस्थितीत भात पिकाचा रापणीचा हंगाम सुरु आहे. जगंलाच्या आजुबाजुचा परिसर भात शेतीमुळे बहरला असून मोकळा भाग कमी आहे. लगतच जंगलाचा भाग असल्याने बिबट्याचा वावर असू शकतो.

बिबट्या आढळल्याबाबत कल्याण वन आधिकारी सजंय चन्ने यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, बदलापूर ते बारावी परिसर जगंलाचा भाग असून बिबट्या जगंलात असू शकतो, ठाकूर पाडा येथे बिबट्या आढळल्याबाबत त्यांनी सांगितले की, आम्ही वनरक्षकांच्या मार्फत गस्त सुरु केली असून ठाकूर पाडा परिसरात शोध घेतला असता बिबट्याच्या पावलांचे ठसे आढळले नसून बिबट्याबाबत जन जागृती करीत रहिवाशांना दक्षता बाळगण्याबाबत सूचना केल्या आहेत. जन जागृतीसाठी स्थानिक प्राणी मित्र, संस्थाची मदत घेणार असल्याचे सांगितले. बिबट्याने पाळीव जनावरे, शेळी, म्हैस यांच्यावर हल्ला केल्याचे दिसले नाही. तरी रहिवाशांनी घाबरून न जाता दक्षता घ्यावी.



ठाणे महापालिकेच्या प्रभाग क्रमांक 27 मधील शिवसेना नगरसेविका अंकिता पाटील यांच्या नगरसेवक निधीतून साळवी नगर, साई नगर, शिवकुटीर सोसायटी परिसरातील अंतर्गत रस्त्यांवर पथदिवे लावण्यात आले आहेत. या पथदिव्यांचे उद्घाटन ज्येष्ठ शिवसैनिक राम पाटील हस्ते करण्यात आले. सोबत सचिन पाटील, शाखाप्रमुख प्रकाश साळवी, तृप्ती पाटील, महिला आघाडीच्या रोहिणी पवार, सोनाली सुर्वे, अमृता धुमडे, उपशाखाप्रमुख अरुण जाधव, कैलाश पाल, गटप्रमुख अमित केसरकर, आकाश शुक्ला तसेच सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते, स्थानिक रहिवासी उपस्थित होते.

# जामदाडेदादांच्या संकल्पपूर्तीचा हा सोहळा-सद्गुरू वासकर महाराज

**ठाणे: चैतन्य सांप्रदाय भजन मंडळ, ठाणे (पूर्व) या मंडळाची स्थापना पुरातन श्री विठ्ठल मंदिरात 1963 साली झाली. तेव्हापासून सलग 52 वर्षे श्री संत सेवक किसन भाऊसाहेब जमदाडे यांची हे श्री विठ्ठल मंदिर कर्मभूमी ठरली. त्यांच्या मनातील धार्मिक पुस्तक आज माझ्या हस्ते प्रकाशित होत आहे. मात्र हा सोहोळा त्यांचे सद्गुरू तात्यासाहेब वासकर व शिष्य किसन जमदाडे यांच्या अनुपस्थितीत पार पडत आहे, ही त्या पांडुरंगाची इच्छा, असे भावपूर्ण मनोगत सद्गुरू श्री विठ्ठलमहाराज तात्यासाहेब वासकर यांनी व्यक्त केले.**

सोमवारी चेंदणी कोळीवाडा कोळी जमात ट्रस्टच्या माणिक हॉलमध्ये जमदाडे यांच्या प्रथम पुण्यतिथीला त्यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या जय जय राम कृष्ण हरी बिज मंत्राच्या-मन संकल्प लहरी ' या धार्मिक पुस्तकाचे प्रकाशन विठ्ठल भक्तांच्या राम कृष्ण हरी उद्घोषात झाले.




त्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विठ्ठलमहाराज वासकर भक्तांना संबोधीत करीत होते. या प्रकाशन सोहोळ्यास अमरेश ठाणेकर, भगवान कोळी, विठोबा सिनलकर, रमाकांत कोळी, दिगंबर सुतार, विजय नाखवा, राहुल ठाणेकर आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

ज्ञानेश्वर जमदाडे यांनी प्रास्ताविक केले तर जमदाडे कुटुंबीयांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रल्हाद नाखवा यांनी सूत्रसंचालन केले.

# क्रीडा संघटक अजय विचारे यांचा गौरव



**ठाणे : यंदापासून बिईंग ह्यूमन चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्या विद्यमाने विविध दहा क्षेत्रातील मान्यवरांचा राष्ट्रीय मानवतावादी सेवक पुरस्काराने सन्मानित करण्याचा उपक्रम सुरु केला आहे.**

विशेष उल्लेखनीय म्हणजे गेल्या 22 वर्षांत सुमारे अडीचशे क्रीडा क्षेत्रातील दिग्गजांचा मराठी गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यार्‍या मुंबईच्या मनोहर विचारे प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष अजय विचारे यांचा राष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्तम क्रीडा संघटक-2021 म्हणून बिईंग ह्यूमन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष प्रियांका शाहा यांच्या हस्ते सन्मानपत्र देवून गौरव करण्यात आला.

बांद्रा येथील एम. एम. के. महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या या राष्ट्रीय प्रतिष्ठेच्या गौरव समारंभास ख्यातकीर्त गायिका अनुराधा पौंडवाल, सिने-दूरदर्शन कलावंत मानसी जोशी आदी उपस्थित होते.

